❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : २८७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या** नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



थोडक्यात...

११ हजार ३४० विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी

पुणे : दैनिक संध्या

राज्यात एमबीबीएस आणि बीडीएस पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत दोन्ही अभ्यासक्रमाच्या ११ हजार ४३१ जागांवर ११ हजार ३४० विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली आहे. तर ९१ जागा रिक्त आहेत. राज्यात महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी कक्ष) एमबीबीएस आणि बीडीएस अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची प्रक्रिया राबविली जाते. एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या यादीत राज्यात एकूण आठ हजार ८१४ जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी आठ हजार ८११ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली आहे. या अभ्यासक्रमाच्या फक्त तीन जागा रिक्त आहेत. यामध्ये ४३ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाच हजार ६५ उपलब्ध जागांवर पाच हजार ६५ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली आहे. तर २५ खासगी वैद्यकीय महाविद्यालयात तीन हजार २९९ उपलब्ध जागांपैकी तीन हजार २९९ जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली आहे. तर दोन खासगी वैद्यकीय विद्यापीठात ४५० उपलब्ध जागांपैकी ४४७ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली आहे.

कोल्हापूर वेशीवर पुन्हा बिबट्या; शोधमोहीम सुरू

कोल्हापूर : दैनिक संध्या

कोल्हापूर शहरालगतच्या शिंगणापूर मुख्य मार्गावरील खांडसरी नाका परिसरात एका तरुणाला बिबट्याचे दर्शन झाल्याची घटना समोर आली आहे. तसेच दत्तनगरमधील काही महिलांनी पहाटे चंबुखडी टाकी परिसरात बिबट्या दिसल्याचा दावा केला आहे. या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वनविभागाने बिबट्याच्या शोधासाठी मोहीम हाती घेतली आहे. सतीश तानाजी पाटील (वय ३६, रा. हणमंतवाडी, ता. करवीर) हे त्यांचे मोठे बंधू हर्षद पाटील यांच्यासोबत रात्री ट्रॅक्टरमधून हणमंतवाडीकडे परतत होते. खांडसरी नाका परिसरातून पुढे गेल्यानंतर योगेश माने यांच्या ट्रेडर्सच्या गोदामाजवळ बिबट्याने ट्रॅक्टरसमोरून उडी मारून गोदामाच्या मागील बाजूस असलेल्या शेतात प्रवेश केल्याचे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. दरम्यान, शिंगणापूर मार्गावरील दत्तनगरमधील काही महिला पहाटे चारच्या सुमारास फिरण्यासाठी गेल्या असता, त्यांना चंबुखडी टाकी परिसरात बिबट्या दिसल्याचा दावा त्यांनी केला आहे. हा बिबट्या लक्षतीर्थ वसाहत किंवा फुलेवाडीच्या दिशेने गेला असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. वनविभागाच्या पथकाने सायंकाळी सहा ते सातच्या सुमारास चंबुखडी टाकीच्या टेकडीपासून सुमारे अडीच किलोमीटरच्या परिसरात ड्रोनच्या सहाय्याने शोधमोहीम राबविली. मात्र, या मोहिमेत बिबट्या आढळून आला नाही. मध्यरात्री एकनंतर पुन्हा शोधमोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

नाशिक-त्र्यंबकेश्वरचा चेहरामोहरा बदलणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : विविध विकासकामांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पाहणी

■ नाशिक (दै. संध्या)

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात सुरू असलेली विविध विकासकामे वेगाने पूर्णत्वाकडे जात असून, या कामांमुळे नाशिक व त्र्यंबकेश्वरचा चेहरामोहरा बदलणार आहे. पुढील २५ ते ३० वर्षांचा विचार करून आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याबरोबरच भाविक, पर्यटक आणि नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेली सर्व कामे निर्धारित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

सिंहस्थ महाकुंभमेळ्याच्या ध्वजारोहण संमारंभाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांनी आज त्र्यंबकेश्वर येथील दर्शनपथ व गोदाघाट तसेच नाशिक येथील द्वारका सर्कल तसेच ओझर विमानतळ येथे भेट देऊन सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची सद्यस्थिती, प्रगती आणि भविष्यातील नियोजनाची माहिती घेतली. यावेळी कामांची गती वाढवून ती वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी पालकमंत्री गिरीश महाजन, जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव तथा



पालक सचिव एकनाथ डवले, आमदार हिरामण खोसकर, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय ऐनपुरे, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक डॉ. एस. व्ही. स्वामी, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, एमएसआयडीसीचे अधिकारी ब्रिजेश दीक्षित उपविभागीय अधिकारी पवन दत्ता, तहसीलदार गणेश जाधव, मुख्याधिकारी गोविंद जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने सुरू असलेली कामे केवळ कुंभमेळ्यापुरती मर्यादित नसून, पुढील २५ ते ३० वर्षांसाठी नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या विकासाचा पाया मजबूत करणारी आहेत. आधुनिक शहराच्या दिशेने वाटचाल करताना वाहतूक व्यवस्था, पायाभूत सुविधा, भाविक व पर्यटकांसाठी सुविधा तसेच नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने ही कामे परिवर्तनात्मक ठरणार आहेत. पुढील टप्प्यात विमानतळाशी संबंधित विकासकामांनाही गती मिळणार आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभाग आणि यंत्रणा समन्वयाने काम करीत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

त्र्यंबकेश्वर येथील दर्शनपथ व गोदाघाट परिसरातील कामे आव्हानात्मक असली तरी ती नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून, परिसराचा चेहरामोहरा बदलण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत. देशभरातून येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येत आहेत. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने त्र्यंबकेश्वरचे महत्त्व अधिक व्यापक करण्यासाठीही या कामांचा उपयोग होणार आहे.

नाशिक येथील द्वारका सर्कलचे काम अत्यंत महत्त्वाचे आणि आव्हानात्मक आहे. मात्र, हे काम नियोजनबद्ध पद्धतीने वेगाने सुरू असून निर्धारित वेळेपूर्वी पूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. यंदाच्या पावसाळ्यात या ठिकाणी पाणी निचऱ्याची चाचणी करण्यात आली असून, पावसाचे पाणी साचणार नाही आणि निचरा सुरळीत होईल, याद्दष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यानंतर त्यांनी ओझर विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या कामाचीही पाहणी केली. सिंहस्थ कुंभमेळानिमित्त नाशिकला येणारे भाविक व पर्यटक यांना आवश्यक व पायाभूत सेवा-सुविधांबाबत अधिक दक्ष राहण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

सर्व यंत्रणांच्या समन्वयातून विकास

महानगरपालिका, एमएसआरडीसी, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच विविध संबंधित विभागांच्या समन्वयातून ही कामे सुरू आहेत. पालकमंत्री, लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांचा समन्वय तसेच सर्व यंत्रणांची एकत्रित टीम म्हणून सुरू असलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. या विकासकामांना गती देणाऱ्या सर्व यंत्रणांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अभिनंदन केले. विशेषतः एमएसआरडीसीने हाती घेतलेल्या महत्त्वपूर्ण कामांचे त्यांनी कौतुक केले.

पदव्युत्तर वैद्यकीय व दंतवैद्यकीय प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक, गुणवत्ताधारित होणार

■ मुंबई (दै. संध्या)

पदव्युत्तर वैद्यकीय व दंतवैद्यकीय अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि गुणवत्ताधारित करण्यासाठी सर्व प्रवेश केंद्रीकृत ऑनलाइन प्रक्रियेद्वारे करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी नव्या नियमांची माहिती घेऊन त्यानुसार प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

राज्य शासनाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी अधिसूचना जारी करून पूर्णवेळ व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय व दंतवैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) नियम, २०२६ अधिसूचित केले आहे.

नव्या नियमांनुसार प्रवेश प्रक्रियेतील संस्थास्तरीय फेरी बंद करण्यात आली आहे. यापुढे संस्थात्मक कोटा आणि अनिवासी भारतीय (एनआरआय) कोट्यातील जागांसह सर्व प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत केंद्रीकृत ऑनलाइन प्रवेश प्रक्रियाद्वारे करण्यात येतील. रिक्त जागांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या स्ट्रे व्हॅकन्सी फेऱ्याही ऑनलाइन पद्धतीनेच पार पडतील. संस्थात्मक कोट्यातील जागांसाठी उमेदवारांच्या पात्रतेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असलेल्या; मात्र राज्याबाहेरील संस्थेतून पदवी पूर्ण केलेल्या उमेदवारांनाही या जागांसाठी पात्र ठरविण्यात आले आहे. तसेच, महाराष्ट्राबाहेरील उमेदवार आणि परदेशी वैद्यकीय पदवीधारकांनाही खासगी महाविद्यालयांतील संस्थात्मक कोट्यातील

- मंत्री हसन मुश्रीफ
- संस्थास्तरीय प्रवेश फेरी बंद
- सर्व प्रवेश केंद्रीकृत ऑनलाइन प्रक्रियेद्वारे होणार



जागांसाठी पात्रता देण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांची पात्रता निश्चित करताना नोंदणीची अंतिम तारीख हा कट-ऑफ दिनांक मानण्यात येणार आहे. या तारखेला आवश्यक पात्रता पूर्ण नसलेल्या उमेदवारास संबंधित शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल. नोंदणीच्या अंतिम तारखेनंतर पात्रता प्राप्त झाल्यास ती त्या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी ग्राह्य धरली जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

थोड्याच महिन्यात सत्ता बदलणार


आमच्या मातीसाठी, संविधानासाठी लढत राहणार, आदित्य ठाकरेंचा एल्गार

■ मुंबई (दै. संध्या)

शिवाजी पार्क परिसरात अनेक आंदोलन झाली आहेत. पण आज पाहिल्यांदाच शिवाजी पार्क परिसरात विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले आहे. आमची माती आणि संविधानासाठी आपण लढत राहू असा इशारा ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी दिला आहे. रस्त्यावर आपण पाहिलच असेल बाचा बाची झाली आहे. ज्या आंदोलकांना ताब्यात घेतले आहे, त्या सर्वांची सुटका होईपर्यंत आम्ही आंदोलन केल्याचे आदित्य ठाकरे म्हणाले. थोड्याच महिन्यात सत्ता बदलणार आहे. जे जे अधिकारी त्रास देतायत, त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे आदित्य ठाकरे म्हणाले

उद्या दिल्लीमध्ये मोठे आंदोलन होणार आहे, मुंबईमध्येही आंदोलन होणार आहे. त्याची रुपरेखा आम्ही सोशल मीडियावर माहिती देऊ असे आदित्य ठाकरे म्हणाले. पोलिसांना केंद्रातून काही आदेश आले आहे का? उद्या सर्व देशप्रेमी नागरिक रस्त्यावर उतरतील असेही ठाकरे म्हणाले. दिल्लीमध्ये बॉर्डर सिक्युरिटी फोर्स आहे. कशासाठी लावली आहे. जेवढं कौतुक मुंबई पोलिसांचं झालं, त्यामुळं केंद्र सरकारचं पोट दुखत असेल असेही ठाकरे म्हणाले.

थोड्याच महिन्यात सत्ता बदलणार आहे. जे जे अधिकारी त्रास देतायत, त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे आदित्य ठाकरे म्हणाले. मधल्या काळात राहुल पावरा आणि आदिवासी विद्यार्थ्यांना देखील ताब्यात घेतलं होतं. आंदोलन दाबण्याचा प्रयत्न झाला तर आम्ही रस्त्यावर उतरु असा इशारा ठाकरेंनी दिला. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार



आता हे आंदोलन शांत होणार नाही

आता हे आंदोलन शांत होणार नाही. आता हे आंदोलन चिघळणार. सगळ्यांनी शिवाजी पार्कच्या दिशेने या. आम्ही आता इथून रात्र झाली तरी हलणार नाही. आम्ही सर्व विभागप्रमुखांना बोलावले आहे. मुंबई पोलीस हे आज दिल्ली पोलिसांसारखे वागले, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले. दरम्यानच्या काळात पोलिसांनी सकाळपासून सीजेपीच्या या आंदोलनात अग्रणी असणारे संदीप देशपांडे आणि मनसेच्या काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. त्यामुळे अमित ठाकरे हे शिवसेना भवनाजवळून निघून शिवाजी पार्क पोलीस ठाण्याबाहेर जाऊन ठिय्या देऊन बसले आहेत. त्यांच्यापाठोपाठ आदित्य आणि तेजस ठाकरे हेदेखील शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत. त्यामुळे आता तिन्ही ठाकरे शिवाजी पार्कच्या परिसरात ठिय्या देऊन बसल्यास पोलीस यंत्रणेच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. सध्या शिवाजी पार्कच्या परिसरात आंदोलक आणि पोलिसांची मोठी गर्दी आहे.

यांच्या विरोधात हे आंदोलन असणार आहे. किती चीड आहे, भाजप आणि ज्ञानेश कुमार यांच्याबद्दल हे दिसून येत आहे. शिवाजी पार्कला छावणीचं स्वरुप आलं आहे, हे कशासाठी? असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला आहे. कारगिल पेक्षा मोठा बंदोबस्त दिल्लीत असल्याचं ठाकरे म्हणाले. आम्ही विवेक भीमानवर यांना भेटणार आहोत. आम्हाला देखील बघायचंय की नेमकं काय आहे इतकं त्यात? असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला. हुकूमशाही मोडून काढणार आहे.

मुंबई पोलिसांचं कौतुक दिल्लीच्या पोटात दुखत असल्याचे ठाकरे म्हणाले. नवरात्रीचा सण आहे. उगाच टेन्शन आहे पोलिसांना अजून कशाला ताण देताय? मेट्रो बंद.. ट्रेन बंद... खिळे लावले आहेत. इथे मारलं तर आम्ही आहोत ना असेही ठाकरे म्हणाले.

केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबत मुख्यमंत्र्यांची बैठक

शेतकरी-शेतमजुरांना रोजगार, अन्नधान्य, पाण्यासह पशुधनाच्या चाऱ्याचे सूक्ष्म नियोजन यावर भर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यात उद्भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना पुढील सहा ते आठ महिने अधिक आधार देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यासाठी रोजगारनिर्मिती, गरजूंपर्यंत अन्नधान्य पोहोचविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पशुधनासाठी चारा-पाणी उपलब्ध करून देण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबतच्या बैठकीत दिली. केंद्रीय पथकाकडून दुष्काळी भागातील परिस्थितीबाबतचा अहवाल केंद्र शासनाला सादर होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

केंद्रीय पथकाने अत्यंत विस्तृत दौरा करून तळागाळापर्यंत प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. त्यामुळे नागरिकांमध्ये आपल्या अडचणी समजून घेतल्याचे समाधान निर्माण झाले असल्याचे या वेळी केंद्रीय पथकाला सांगितले. केंद्रीय पथकाच्या संवेदनशील पाहणीमुळे दुष्काळाची



तीव्रता केंद्र शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीस आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाचे प्रमुख तथा केंद्रीय संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्यासह केंद्रीय पथकातील सदस्य उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मान्सूनच्या पहिल्या दोन महिन्यांत चांगला पाऊस झाल्याने विक्रमी उत्पादनाची अपेक्षा होती. पिके फुलोऱ्याच्या अवस्थेत असतानाच त्यानंतर पावसात सुमारे दोन महिने खंड पडला. त्यामुळे सोयाबीन पिकाला अनेक ठिकाणी सर्वाधिक झळ बसली. तर कापूस, तूर आणि ऊस ही पिकेही बाधित झाली आहेत. पाण्याअभावी रब्बीची पेरणी होण्याची शक्यता कमी असून उन्हाळी पिकांनाही वाव राहिलेला नाही. खरीप हंगामातील नुकसान रब्बी किंवा उन्हाळी पिकातून भरून काढण्याची संधीही यंदा शेतकऱ्यांना मिळणार नाही. शेतीबरोबरच शेतमजुरी करणाऱ्या लहान शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे रोजगार आणि अन्नसुरक्षेच्या योजनांच्या माध्यमातून नियोजन करुन मदत देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुंबई आणि पुण्यासारख्या मोठ्या शहरांना काही दिवस झालेल्या पावसाचा लाभ झाला असला तरी उर्वरित महाराष्ट्रात, विशेषतः ग्रामीण भागातील लहान गावांमध्ये पाण्याचे स्रोत आटले आहेत. या भागांत मोठ्या प्रमाणावर टँकरची व्यवस्था करावी लागणार आहे. टँकरद्वारे पाणी पुरवठ्यात तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक गावापर्यंत पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पाणी पोहोचविण्याचा आराखडा राज्य शासन तयार करीत आहे. ऑगस्ट 2027 पर्यंत उपलब्ध पाण्याचे पहिले आरक्षण पिण्यासाठी करण्यात आले आहे. त्यात नागरिक आणि पशुधनासाठी आवश्यक पाण्याची स्वतंत्र तरतूद केली असून त्यानंतरच अन्य वापरासाठी पाणी उपलब्ध केले जाईल. या आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. दुष्काळी परिस्थितीत केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून जलसाठ्यांतील गाळ काढणे, दुरुस्ती आणि पुनरुज्जीवनाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येतील. यापूर्वी 25 हजार गावांमध्ये राबविलेल्या कामांमुळे 15 ते 17 टक्के पाणी तूट असतानाही त्या भागांना दिलासा मिळाला. सॉफ्टवेअर आणि ॲपच्या माध्यमातून अशा कामांची पारदर्शक अंमलबजावणी करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

‘चला शाळेत जाऊया’ अभियानाला राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद

■ मुंबई (दै. संध्या)



राज्यातील शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता, पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांची उपस्थिती, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया तसेच विविध शासकीय शैक्षणिक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या वतीने ‘चला शाळेत जाऊया’ अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाला राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मंत्री, वरिष्ठ अधिकारी, पालक, अधिकारी आणि जिल्हा नोडल अधिकारी यांच्या प्रत्यक्ष शाळा भेटींमुळे शालेय प्रशासनातील सकारात्मक बाबी, अडचणी आणि आवश्यक सुधारणांच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध होत आहे. मंत्री भुसे यांनी अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात ७ ते ९ ऑक्टोबर दरम्यान कोकण विभागातील विविध शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन शैक्षणिक गुणवत्ता व पायाभूत सुविधांचा आढावा घेतला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पांडुरंगशेठ पडते, पडतेवाडी तसेच जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा, खारेपाटण क्रमांक १, रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा, पानवल, होरंबेवाडी आणि जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक केंद्र शाळा झरेवाडी, रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा आदिवासीवाडी तसेच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, झिरड येथे भेट देऊन शाळांमधील शैक्षणिक व भौतिक सुविधांची पाहणी केली. या भेटींदरम्यान विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन व अध्ययन कौशल्यांचा आढावा घेण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच ‘आयडॉल शिक्षक’ म्हणून निवड झालेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. शालेय शिक्षण विभागाचे ‘राष्ट्र प्रथम’ हे ब्रीदवाक्य केंद्रस्थानी ठेवून पायाभूत सुविधांसोबतच गुणवत्तापूर्ण, आनंददायी आणि संस्कारक्षम शिक्षणाला प्राधान्य देण्याचे निर्देश मंत्री भुसे यांनी दिले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना, सामाजिक मूल्ये आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित करण्यासाठी शिक्षक व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत, असे मंत्री भुसे यांनी यावेळी नमूद केले.

संपादकीय

एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विद्यार्थ्यांचे पुणे येथे एस एम जोशी पुलाजवळ गेले दहा दिवस सुरू असलेल्या आंदोलनात युवकांचा सक्रिय सहभाग दिवसेदिवस वाढत आहे.आंदोलनाच्या दहाव्या दिवशीही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर विद्यार्थी ठाम असून मागण्यावर चर्चा करण्याची तयारी त्यांनी दर्शवलेली आहे. एमपीएससी परीक्षा मधील कथित पेपर फुटी. वारंवार पुढे ढकलल्या जाणाऱ्या परीक्षा. रखडलेली भरती. आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक व आर्थिक नुकसान. या मुद्द्यावरून पुण्यात स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे अध्यक्षांचा राजीनामा आणि ७० हजार पदांची भरती प्रक्रिया मार्गी लावण्याच्या मागणीसाठी एस एम जोशी पूल तसेच लालबहादूर शास्त्री रस्त्यावर विद्यार्थी गेले दहा दिवस आंदोलन करत आहेत. विद्यार्थ्यांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केल्यानंतरही आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका विद्यार्थ्यांनी कायम ठेवली आहे. आंदोलनात सहभागी झालेले विद्यार्थी गरीब व सर्वसामान्य आणि शेतकरी कुटुंबातील आहेत. दुष्काळग्रस्त मराठवाडा विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील आहे. सरकार विरोधात संघर्ष करण्याऐवजी अभ्यास करून भविष्य घडविण्याची त्यांची इच्छा आहे. मात्र मागण्याकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन सुरूच राहील असा इशारा विद्यार्थ्यांनी दिलेला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनामाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी सरकारने आंदोलक विद्यार्थ्यांमध्ये वाटाघाटी सुरू आहेत असे समजते. या पार्श्वभूमीवर आयोगाचे अध्यक्ष भिमनवार यांच्या न्यायालयीन चौकशीसाठी स्थापन करण्यात येणाऱ्या समितीत आंदोलकांनी सुचविलेल्या पाच सदस्यांचा समावेश करावा. आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत भिमनवार यांना पदावरून दूर ठेवावे असा प्रस्ताव विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविला असल्याचे समजते. आता या प्रस्तावावर सरकार काय भूमिका घेणार? यावर या आंदोलनाचे पुढील भवितव्य अवलंबून आहे.आंदोलकाच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांना दिलेल्या प्रस्तावानुसार आयोगाच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी गठित केलेल्या समितीत आंदोलनाच्या शिष्टमंडळाले शिफारस केलेल्या पाच सदस्यांचा समावेश करावा या समितीचे अध्यक्ष म्हणून उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती अभय ओक.तर सचिव म्हणून तुकाराम मुंडे यांची नियुक्ती करावी. तसेच समितीने महिनाभरात चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करावा. चौकशी पूर्ण होईपर्यंत आयोगाचे अध्यक्ष भिमनवार यांना पदावरून दूर ठेवावे. अशी मागणी विद्यार्थ्यांनी केलेली आहे. एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला कारणीभूत ठरलेली औषध इन्स्पेक्टरची परीक्षा रद्द करण्यात यावी. आणि चुकीचे मूल्यमापन करण्याच्या विरोधात हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरलेले आहेत. परीक्षा प्रणालीमध्ये पारदर्शकता असावी. आणि अध्यक्षांचा राजीनामा द्यावा. या प्रमुख मागण्यासाठी विद्यार्थ्यांचे हे आंदोलन आहे. सरकार मात्र ही प्रशासकीय चूक असल्याचे सांगून मोकळे होताना दिसत आहे.परंतु त्या लाखो विद्यार्थ्यांचे काय होईल?की जे ग्रामीण भागातून आलेले गरीब दुष्काळग्रस्त कुटुंबातील आहेत. सरकारी नोकरीचे स्वप्न पहात त्यांनी पुणे येथे शिकवणी क्लास लावले आहेत. पुण्यात राहणे. खाणे. पिणे आणि शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी त्यांच्या पालकांचे लाखो रुपये खर्च होत आहेत. जेव्हा प्रश्नपत्रिका फुटतात आणि परीक्षा दीर्घकाळासाठी स्थगित करण्यात येतात. तेव्हा या विद्यार्थ्यांचे आर्थिक संकट आणखी वाढत जाते याशिवायही ते वाढत जाते की काय?असल्याची त्यांना भीती असते. पेपर फुटीचे संकट केवळ महाराष्ट्र पुरते मर्यादित नाही तर उच्च पदावर असलेल्या भ्रष्ट अधिकारी आणि त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना नोकरी मिळवून देण्यासाठी असे प्रकार ठरवून घडवून आणतात. हे जगजाहीर आहे. या गैरप्रकाराला सत्ताधारी राजकीय पक्षांचे पाठबळ असते हे सिद्ध झालेले आहे याविरुद्ध संपूर्ण देशातील तरुणांमध्ये असंतोष उसळलेला आहे. अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखालील कॉक्रोच जनता पक्षाने (सीजेपी) एमपीएससी विद्यार्थी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतलेला आहे. यापूर्वी दिल्ली येथील जंतर-मंतरवर नेट परीक्षेच्या पेपर फुटीविरुद्ध सीजीपीने आंदोलन केले होते. पेपर फुटीमुळे विद्यार्थ्यांवर विपरीत मानसिक व शारीरीक परिणाम होत असतो. सीजेपी परीक्षा पद्धतीमध्ये पारदर्शकता आणण्याची मागणी विद्यार्थी करीत आहे. या आंदोलनाचा परिणाम महाराष्ट्रात २३ ऑक्टोबर रोजी होऊ घातलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकावर होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील सत्ताधारी माहिती सरकारला त्याची फार मोठी भीती आहे असे समजते. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार. रोहित पवार आणि मनसे प्रमुख राज ठाकरे. शिवसेनेचे आदित्य ठाकरे काँग्रेसचे बंटी पाटील. कदम. यांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांचे हे आंदोलन राजकीय असल्याचे म्हटले आहे. या आंदोलनामुळे निर्माण होणारा तणाव दूर करण्याच्या उद्देशाने सरकारने चौकशी समिती स्थापन करण्याच्या ठरवले आहे. सरकार विरोधी पक्षांना दोषी ठरवीत आहे.परंतु सरकारने अशी व्यवस्था केली पाहिजे की ज्यामुळे परीक्षा वेळेवर होतील आणि पेपर फुटी चे प्रकरण होणार नाही पुणे येथे एमपीएससीच्या विद्यार्थ्यांची जी आंदोलने सुरू आहे. त्यामध्ये परीक्षेमधील घोटाळे दूर करण्यावर भर देण्यात आला पाहिजे. दरम्यान पोलिसांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अहवालाचा आदेश देऊन आंदोलन करताना सार्वजनिक ठिकाणी आंदोलन न करण्याचे आवाहन केलेले आहे.आता आंदोलकांनी दिलेल्या नव्या प्रस्तावावर सरकार काय निर्णय घेते?याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागलेले आहे. सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्याबाबत ठोस भूमिका घेतल्यास आंदोलनावर तोडगा निघण्याची शक्यता आहे.

इंदापूर तालुक्यात रेशनकार्डधारकांना नोटिसा

लाभार्थ्यांमध्ये संभ्रम, तपासणी पारदर्शक करण्याची शिवसेनेची मागणी

■ वालचंदनगर (दै. संध्या)



इंदापूर तालुक्यातील अनेक रेशनकार्ड धारकांना तहसील कार्यालयाकडून उत्पन्नाच्या कारणास्तव नोटिसा बजावण्यात आल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. उत्पन्न जास्त असल्याचा ठपका ठेवत काही लाभार्थ्यांकडून आतापर्यंत घेतलेल्या रेशनधान्याच्या बदल्यात रक्कम भरण्याची सूचना करण्यात येत असल्याचे समोर आले आहे. तसेच काहींना रेशनकार्ड शुभ्र (पांढऱ्या) श्रेणीत वर्ग करण्याबाबत नोटिसा मिळाल्याची माहिती आहे. या प्रकरणात प्रशासनाने घाईघाईने निर्णय न घेता प्रत्येक लाभार्थ्याच्या कागदपत्रांची सखोल तपासणी करावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. शिवसेना तालुका संघटक सुदर्शन रणवरे यांनी जिल्हाप्रमुख संजय काळे यांच्या उपस्थितीत इंदापूर तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक सुधीर जायभाय यांना निवेदन सादर केले. रेशनधान्य हे गरीब, अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी महत्त्वाचा आधार असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले.

संगणकीय नोंदींमधील चुका, आधार कार्डाशी संबंधित अडचणी, ई-केवायसीतील त्रुटी, दुबार नोंदी किंवा इतर तांत्रिक कारणांमुळे पात्र लाभार्थ्यांची नावे यादीतून वगळली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणत्याही कुटुंबाला अपात्र ठरवण्यापूर्वी संबंधित कागदपत्रांची पडताळणी करावी आणि त्यांना आपली बाजू मांडण्याची पुरेशी संधी द्यावी, अशी मागणी रणवरे यांनी केली. नोटिसांमागील शासनाचे आदेश, लागू असलेले नियम आणि पात्रतेचे निकष प्रशासनाने नागरिकांसमोर स्पष्ट करावेत. तसेच अंतिम निर्णय होईपर्यंत पात्र कुटुंबांचे रेशनकार्ड किंवा धान्याचा लाभ बंद करू नये, असेही निवेदनात म्हटले आहे. रेशनकार्डमधील चुका दुरुस्त करणे, आवश्यक कागदपत्रे सादर करणे आणि मृत व्यक्तींची नावे वगळणे यांसारख्या कामांसाठी तालुकास्तरावर विशेष शिबिरे आयोजित करावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना प्रशासकीय अडचणी सोडवण्यासाठी मदत मिळेल आणि केवळ तांत्रिक कारणांमुळे पात्र कुटुंबे अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत, अशी भूमिका शिवसेनेने मांडली. यावेळी युवासेना तालुकाप्रमुख सचिन इंगळे, शहरप्रमुख अविनाश खंडाळे, शहर संघटक देवा मगर, दत्ता खुटे, उपशहरप्रमुख युवराज लोंढे, विष्णू चोरमले, स्वप्नील उतेकर, विजयासिंह चोरमले यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. रेशनकार्डधारकांच्या पात्रतेची तपासणी नियमानुसार आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी, तसेच पात्र लाभार्थ्यांच्या अन्नधान्याच्या हक्काचे संरक्षण करावे, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

माळेगावात बैलपोळ्यादिनी शेतकऱ्याकडून अनोखा कार्यक्रम

■ माळेगाव (दै. संध्या)



शेतीप्रधान संस्कृतीत बैलपोळा सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.शेतकऱ्यांच्या जीवनात पशुधनाला असलेले स्थान अधोरेखित करणाऱ्या या सणाचे औचित्य साधून माळेगाव बुद्रुक येथील गजानन बोडरे परिवाराच्या वतीने हरणी गायीच्या डोहाळे जेवणाचा अनोखा आणि भावपूर्ण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.भारतीय संस्कृतीत गायीला पूजनीय स्थान आहे. शेतकरी कुटुंबात पशुधन हे केवळ उत्पन्नाचे साधन नसून कुटुंबातील सदस्याप्रमाणे त्याची जपणूक केली जाते.याच प्रेमातून हरणी गायीच्या डोहाळे जेवणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या सोहळ्याच्या माध्यमातून पशुप्रेम, ग्रामीण परंपरा आणि शेतीसंस्कृतीचे दर्शन घडणार आहे. ग्रामीण भागातील पारंपरिक संस्कृती आणि पशुधनाविषयीचे प्रेम जपणारा हा सोहळा परिसरातील नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.या डोहाळे कार्यक्रमाच्या निमित्ताने परिसरातील अनेक मान्यवरांनी भेट देऊन बोडरे कुटुंबांचे कौतुक केले.यावेळी गजानन संजय बोडरे,धनंजय संजय बोडरे,धनश्री संजय बोडरे,राजश्री संजय बोडरे, कुटुंब प्रमुख कलाबाई गंगाराम बोडरे, आशा संजय बोडरे आदींनी या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

माळेगाव पोलिसांकडून वाहतुकीस पर्यायी मार्ग उपलब्ध

श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने वाहतुकीत बदल

■ माळेगाव (दै. संध्या)



श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना,सोमेश्वरनगर येथील सन २०२६ मधील पंचवार्षिक निवडणुकीच्या अनुषंगाने दि. १२/१०/२०२६ रोजी सकाळी ०७.०० वाजल्यापासून ते दि. १३/१०/२०२६ रोजी सकाळी ०७.०० वाजेपर्यंत मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.सदर मतमोजणीसाठी माळेगाव बुद्रुक, ता.बारामती,जि.पुणे येथील मतमोजणी केंद्राच्या परिसरात राजकीय पक्षांचे पदाधिकारी,उमेदवार,कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे. मतमोजणी केंद्राच्या परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये, अपघात घडू नयेत तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पुणे ग्रामीण पोलीस प्रशासनाकडून वाहतुकीचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित कालावधीत बारामती-निरा मार्गावरील वाहतुकीत बदल करून पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

वाहतुकीतील बदल व पर्यायी मार्ग पुढीलप्रमाणे : दि. १२/१०/२०२६ रोजी सकाळी ०७.०० वाजल्यापासून ते दि. १३/१०/२०२६ रोजी सकाळी ०७.०० वाजेपर्यंत मौजे माळेगाव बुद्रुक,ता. बारामती,जि.पुणे येथील बारामती-निरा मार्गावरील शारदानगर ते माळेगाव राजहंस चौक या दरम्यान सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंदी राहणार आहे.

पर्यायी मार्ग : शारदानगर पासून के.व्ही. के ट्रस्ट केनॉल रोडने माळेगाव राजहंस चौक येथे व राजहंस चौक ते माळेगाव कारखाना मार्ग पाहुणेवाडी शारदानगर बारामती या मार्गाने सर्व प्रकारची वाहने वळविण्यात येत आहे.

सदर वाहतूक बदलातून शासकीय वाहने व अत्यावश्यक सेवांची वाहने वगळण्यात येणार आहेत.

नागरिकांनी व वाहनचालकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे,वाहतूक नियमांचे पालन करावे आणि प्रवासासाठी पर्यायी मार्गांचा वापर करावा,असे आवाहन माळेगाव पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात येत आहे.

सासवड शहरातील सर्व मंदिरावर सूर्योदयापूर्वी भगवा ध्वज

■ सासवड (दै. संध्या)



सासवड शहरातील सर्व मंदिरांवर वर्षातून चार वेळा एकाच दिवशी, सूर्योदयाच्या वेळी भगवा ध्वज उभारण्याचा उपक्रम गेली चार वर्षे सासवड सांस्कृतिक मंडळातर्फे यशस्वीरीत्या राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत रविवारी (ता.११) घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर सासवड परिसरातील विविध मंदिरांवर भक्तिभावात भगवे ध्वज फडकविण्यात आले, तर पालखी तळावर पताका उभारण्यात आल्या. घटस्थापनेच्या निमित्ताने सासवडचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ, श्री भैरवनाथ आणि माता जोगेश्वरी मंदिरासह शहरातील शिवालय, संगमेश्वर, चांगावटेश्वर, सोपाननगर व गावठाणातील महालक्ष्मी माता मंदिर तसेच इतर प्रमुख मंदिरांवर एकाच वेळी सूर्योदयाच्या सुमारास भगवा ध्वज फडकविण्यात आला. सासवड सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष व माजी आमदार संजय जगताप यांच्या संकल्पनेतून या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात झाली आहे. या उपक्रमांतर्गत वर्षातून चार वेळा म्हणजेच घटस्थापना, दिवाळी पाडवा, मकर संक्रांत, गुढीपाडवा आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सासवडमध्ये येण्याच्या दिवशी सर्व मंदिरांवरील ध्वज बदलले जातात. यासाठी सासवड सांस्कृतिक मंडळ आणि संबंधित मंदिर परिसरातील कार्यकर्त्यांनी ही जबाबदारी आवडीने स्वीकारल्याची माहिती मंडळाचे सचिव रवींद्रपंत जगताप यांनी दिली.

यावेळी देवस्थानचे मानकरी बापू गिरीगोसावी बुवा, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष रमेश जगताप, उपाध्यक्ष पांडुरंग भोंगळे, गावपाटील संग्राम जगताप, रामभाऊ इनामके, विजय इनामके, मंगेश जगताप, संतोष म्हेत्रे यांच्या हस्ते भगवा ध्वज फडकविण्यात आला. पुजारी हर्ष भैरवकर, हरी भैरवकर, रामभाऊ भैरवकर, गणेश भैरवकर यांनी धार्मिक विधी केले. याप्रसंगी मंडळाचे सचिव रवींद्रपंत जगताप, सदस्य अमित पवार, दीपक जगताप, जीवन कड उपस्थित होते.



कोऱ्हाळे गावातील मतदान केंद्रावर एकूण ७५ टक्के मतदान

■ कोऱ्हाळे बु. (दै. संध्या)

■ कोऱ्हाळेत श्री सोमेश्वर कारखान्याच्या निवडणुकीत उमेदवारांसह सभासदांचा मतदान प्रक्रियेत उत्स्फूर्त सहभाग

कोऱ्हाळे बुद्रुक गावात श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना निवडणुकीत सकाळपासून चालू असलेल्या मतदान केंद्रांवर स्थानिक उमेदवार तसेच ऊस उत्पादक सभासदांनी मतदानासाठी उत्स्फूर्त असा सहभाग नोंदविला.स्थानिक उमेदवारांनी या निवडणुकीत विजयी होण्यासाठी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे,पण सभासद कोणाला विजयी करणार याकडे देखील सभासदांसह उमेदवारांचे लक्ष लागले आहे.सकाळपासून चालू असलेल्या मतदान प्रक्रियेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सभासदांकडून एकूण ७५% मतदान झाले आहे.यावेळी श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे सभासद मतदानासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने मतदान प्रक्रिया शांततेत व सुरक्षिततेत पार पडली.

दुष्काळी परिस्थितीत फळबाग व्यवस्थापन; पाणी वाचवा, फळझाडे जगवा!

संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रातील शेतीसमोर दुष्काळ, अनियमित पाऊस, वाढते तापमान आणि भूजलपातळीत होणारी घट ही गंभीर आव्हाने उभी आहेत. विशेषतः आंबा, डाळिंब, पेरू, संत्रा, मोसंबी यांसारख्या फळपिकांच्या बागांना पाणीटंचाईचा मोठा फटका बसतो. फळबाग उभी करण्यासाठी शेतकरी अनेक वर्षे मेहनत, वेळ आणि पैसा खर्च करतो. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत फळझाडांचे संरक्षण करणे, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि बागेचे दीर्घकालीन आरोग्य जपणे अत्यंत आवश्यक आहे. 'पाणी वाचवा, फळझाडे जगवा' हा मंत्र प्रत्येक फळबागायतदाराने अंगीकारणे ही काळाची गरज आहे. योग्य नियोजन, आधुनिक सिंचन पद्धती आणि शास्त्रीय व्यवस्थापन यांच्या मदतीने कमी पाण्यातही फळबागेचे नुकसान कमी करता येऊ शकते. आच्छादनाचा वापर करून जमिनीतील ओलावा टिकवावा.

दुष्काळी परिस्थितीत जमिनीतील ओलावा टिकवणे हा फळबाग व्यवस्थापनाचा सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. झाडांच्या बुंध्याभोवती वाफसा राखून वाळलेली पाने, गवत, उसाचे पाचट, भुसा किंवा इतर सेंद्रिय अवशेषांचे आच्छादन करावे. यामुळे जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन कमी होते, मातीचे तापमान नियंत्रित राहते आणि तणांची वाढही कमी होते. आच्छादन करताना झाडाच्या बुंध्याला थेट चिकटून ओलसर सेंद्रिय पदार्थ साचणार नाहीत, याची काळजी घ्यावी. त्यामुळे बुंध्याशी संबंधित रोगांचा धोका कमी करण्यास मदत होते.

पाणीटंचाईच्या काळात पाटाने किंवा सरीने पाणी देण्याऐवजी ठिबक सिंचनाचा वापर अधिक उपयुक्त ठरतो. ठिबक सिंचनामुळे पाणी झाडांच्या मुळांच्या कार्यक्षेत्रात नियंत्रित प्रमाणात देता येते. त्यामुळे पाण्याचा अपव्यय कमी करण्यास मदत होते. ठिबक संचातील नळ्या, तोट्या, फिल्टर आणि जोडण्या नियमित तपासाव्यात. गळती किंवा अडथळे आढळल्यास त्वरित दुरुस्ती करावी. झाडांचे वय, मातीचा प्रकार, हवामान आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन सिंचनाचे वेळापत्रक ठरवावे.

तसेच बागेतील तणांचे नियंत्रण करावे. तणांमुळे पाणी आणि अन्नद्रव्यांसाठी स्पर्धा वाढते. मात्र, जमिनीची धूप होणार नाही आणि मुळांना इजा होणार नाही, अशा पद्धतीने तण व्यवस्थापन करावे.

पाण्याची कमतरता असताना झाडांना अन्नद्रव्यांचा पुरवठा योग्य प्रमाणात होणे आवश्यक आहे. मात्र, केवळ जास्त खत दिल्याने झाडांची वाढ चांगली होईल असे नाही. पाण्याची उपलब्धता, झाडांची अवस्था आणि मातीतील अन्नद्रव्यांची स्थिती यांचा विचार करून खत व्यवस्थापन करावे. माती परीक्षणानुसार सेंद्रिय खते, शेणखत किंवा कंपोस्टचा वापर करावा. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार योग्य उपाययोजना कराव्यात. पाण्याची तीव्र कमतरता असताना अनावश्यक खतांचा वापर टाळावा.

दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा ताण, तापमानातील वाढ आणि अन्नद्रव्यांचे असंतुलन यांमुळे फुलगळ व फळगळ वाढू शकते. त्यामुळे बागेतील झाडांची नियमित पाहणी करावी. झाडांवरील फळांचा भार, झाडांची वाढ आणि उपलब्ध पाणी यांचा समतोल राखावा. आवश्यकतेनुसार छाटणी करावी; मात्र ती पिकाच्या प्रकारानुसार आणि योग्य हंगामातच करावी. फळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच झाडावरील अनावश्यक ताण कमी करण्यासाठी कृषी विद्यापीठ किंवा कृषी विभागाने शिफारस केलेल्या उपायांचा अवलंब करावा. पाण्याच्या ताणामुळे झाडांची प्रतिकारक्षमता कमी होऊ शकते. त्यामुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव वेळेवर ओळखणे महत्त्वाचे आहे. पानांवरील डाग, पाने पिवळी पडणे, फांद्या वाळणे किंवा फळांवर असामान्य लक्षणे दिसल्यास त्यांची कारणे तपासावीत. बागेतील वाळलेल्या आणि रोगट फांद्या योग्य पद्धतीने काढाव्यात. बाग स्वच्छ ठेवावी आणि रोग-कीड व्यवस्थापनासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. कीटकनाशके किंवा बुरशीनाशके वापरताना पिकासाठी नोंदणीकृत उत्पादन, लेबलवरील सूचना आणि कृषी तज्ज्ञांचा सल्ला यांचे पालन करावे. उन्हाळ्यात जमिनीचे तापमान वाढल्यामुळे मुळांच्या कार्यक्षमतेवर आणि झाडांच्या वाढीवर परिणाम होऊ शकतो. झाडांच्या खोडाचे संरक्षण करण्यासाठी कृषी विभागाने शिफारस केलेल्या पद्धतीनुसार खोडाला संरक्षक लेप द्यावा. आवश्यकतेनुसार योग्य आच्छादनाचा वापर करावा. लहान झाडे आणि नव्याने लागवड केलेल्या रोपांना विशेष काळजी द्यावी. पाण्याचे नियोजन करताना केवळ ठरावीक वेळापत्रकावर अवलंबून न राहता जमिनीतील ओलावा आणि हवामानाची परिस्थिती लक्षात घ्यावी.फळे तयार होण्याच्या अवस्थेत त्यांचे संरक्षण करणेही महत्त्वाचे आहे. पिकानुसार योग्य आकाराच्या व हवेशीर फळसंरक्षक पिशव्यांचा वापर करता येतो. त्यामुळे काही पिकांमध्ये कीड, पक्षी आणि उन्हामुळे होणारे नुकसान कमी करण्यास मदत होते. फळांची तोडणी योग्य परिपक्वतेच्या अवस्थेत करावी. तोडणी करताना फळांना इजा होणार नाही, याची काळजी घ्यावी. स्वच्छ हाताळणी, योग्य प्रतवारी, सुरक्षित पॅकिंग आणि योग्य साठवण यामुळे फळांची गुणवत्ता टिकवता येते आणि बाजारातील नुकसान कमी करता येते. दुष्काळावर मात करण्यासाठी केवळ उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे पुरेसे नाही, तर पावसाचे पाणी साठवणे आणि जमिनीत मुरवणेही आवश्यक आहे.

- उपलब्ध पाण्याचा काटकसरीने आणि नियोजनबद्ध वापर करा.
- ठिबक सिंचनाची नियमित तपासणी व देखभाल करा.
- जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी सेंद्रिय आच्छादनाचा वापर करा.
- माती परीक्षणानुसार संतुलित खत व्यवस्थापन करा.
- बागेतील कीड, रोग आणि तणांचे नियमित निरीक्षण करा.
- अनावश्यक पाणी, खते आणि कीटकनाशकांचा वापर टाळा.
- कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी विद्यापीठांच्या शिफारशींचे पालन करावे.
- पुढील हंगामासाठी पाणी साठवण आणि जलसंधारणाचे नियोजन आतापासूनच करा.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



सर्वपित्री अमावस्येला ८२ बेवारस अस्थींचे विसर्जन

पुणे : दैनिक संध्या

मृत्यूनंतर प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने अखेरचा निरोप मिळावा, या माणुसकीच्या भावनेतून राष्ट्रीय कला अकादमी आणि पुणे महानगरपालिकेच्या ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सर्वपित्री अमावस्येनिमित्त ८२ बेवारस मृतांच्या अस्थींचे विधिवत पूजन करून नदीत विसर्जन करण्यात आले. या उपक्रमाचे यंदा १६ वे वर्ष आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर संगम घाट येथे हा कार्यक्रम झाला. यावेळी सहाय्यक आयुक्त भास्कर महाडिक, विभागीय आरोग्य निरीक्षक सुनील तंवर, आरोग्य निरीक्षक निखिल शेंडगे, सचिन निकाळजे, विक्रम सरोदे, विश्व हिंदू परिषदेचे किशोर चव्हाण, डॉ. मिलिंद भोई, शिरीष मोहिते, सदाशिव कुंदेन, राष्ट्रीय कला अकादमीचे मंदार रांजेकर, अमर लांडे, योगेश गोलांडे, रोमा लांडे, किरण फाळके, अक्षय खिवंसरा, अश्विनी बैकर, राजेश निकम, दीपक सुतार, गणेश ओरसे, प्रिया भोंडवे, सचिन देसाई, पल्लवी सरोदे, बाला शुक्ला, नगरसेवक राजेंद्र काकडे, लता राजगुरू, संजय मयेकर, ॲड. उमेश झाडे, मनीष अंदे, सागर पवार, सागर घम, भारतीय नौदलाचे विकास पोटावत्री, नम्रता पवार, मनीषा निंबाळकर, सुषमा खटावकर, विनायक घाटे, मनीष साळुंखे, माधव साळुंखे आणि आशिष जराड आदी उपस्थित होते. मंदार रांजेकर म्हणाले, हिंदू धर्मातील श्रद्धेनुसार, मृत व्यक्तीच्या अस्थींचे विसर्जन केल्याने आत्म्यास शांती व मोक्ष प्राप्त होतो, अशी धारणा आहे. मात्र, अपघात किंवा अन्य कारणांमुळे मृत्युमुखी पडलेल्या काही व्यक्तींची ओळख पटत नाही. अशा व्यक्तींच्या अस्थींचे विसर्जन करण्यासाठी नातेवाईक उपलब्ध नसतात. त्यामुळे या मृतांनाही सन्मानाने अखेरचा निरोप मिळावा आणि त्यांच्या अस्थींचे विधिवत विसर्जन व्हावे, या उद्देशाने राष्ट्रीय कला अकादमीच्या वतीने दरवर्षी सर्वपित्री अमावस्येला हा उपक्रम राबविण्यात येतो.

घटस्थापनेला श्री महालक्ष्मी देवीला २ किलो सोन्याचा रत्नजडित मुकुट



पुणे : दैनिक संध्या

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग येथे सार्वजनिक नवरात्रोत्सवानिमित्त देवीसाठी अत्यंत आकर्षक आणि कलात्मक असा भव्य सुवर्ण मुकुट साकारण्यात आला. सुमारे २ किलो सोन्यापासून तयार करण्यात आलेला रत्नजडित मुकुट घटस्थापनेला देवीला परिधान करण्यात आला. संपूर्ण नवरात्रोत्सवात हा मुकुट पाहण्याची संधी देवी भक्तांना मिळणार आहे. मंदिर ट्रस्टच्या प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल म्हणाल्या, मुकुटामध्ये श्री लक्ष्मी-विष्णू गरुडावर विराजमान असलेले मनोहारी रूप साकारण्यात आले आहे. यासोबतच अष्टलक्ष्मींच्या विविध स्वरूपांचे अत्यंत बारकाईने आणि कलात्मक पद्धतीने चित्रण करण्यात आले आहे. याची निर्मिती राठोड ज्वेलर्सचे संजय राठोड यांनी केली आहे. मुकुटाचे विशेष आकर्षण म्हणजे त्यामध्ये वापरण्यात आलेली विविध प्रकारची मौल्यवान रत्ने. प्रत्येक देवस्वरूपाच्या भावमुद्रा, चेहऱ्यावरील भाव आणि सूक्ष्म तपशील स्वतंत्रपणे अधोरेखित करण्यात आले असून, त्यामुळे संपूर्ण कलाकृती अधिक जिवंत आणि देखणी भासते. उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल म्हणाल्या, मुकुटावर करण्यात आलेले अतिशय सुबक आणि नाजूक नक्षीकाम हे विशेष लक्षवेधी आहे.

महाराजा अग्रसेन जयंतीनिमित्त वाकडमध्ये धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

पुणे : दैनिक संध्या

महाराजा अग्रसेन जयंतीच्या पावन निमित्ताने अग्रवाल समाज, पार्क स्ट्रीट, वाकड यांच्या वतीने रविवार, ११ ऑक्टोबर २०२६ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. समाजातील धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सांस्कृतिक परंपरांना बळकटी देण्याच्या उद्देशाने हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने रथयात्रा, माता की चौकी, जागरण, महाआरती, महाप्रसाद तसेच डांडिया उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायक तरुण मोदी यांच्यासह अन्य कलाकारांच्या विशेष सांस्कृतिक प्रस्तुती आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ४ वाजता रथयात्रेने होणार असून, त्यानंतर सायंकाळी ६ वाजता माता की चौकी व जागरणाचा कार्यक्रम होईल. धार्मिक वातावरणासोबतच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे. पार्क स्ट्रीट परिसरातील सर्व नागरिक तसेच समाजबांधवांनी सहकुटुंब या सोहळ्यात सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. महाराजा अग्रसेन यांच्या सामाजिक समता, बंधुभाव आणि मानवसेवेच्या विचारांचा प्रसार व्हावा, तसेच समाजातील एकजूट अधिक मजबूत व्हावी, हा या आयोजनामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

पीसीसीओईने पटकावला एस्ट्रोवर्स अक्षयान मध्ये देशात प्रथम क्रमांक

पुणे : दैनिक संध्या

एस्ट्रोवर्स अक्षयान २०२६'स्पर्धेत पीसीसीओईच्या टीम अनंतमने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या टीमचे भारतीय एरोस्पेस क्षेत्राकडे टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. टीम अनंतमने रॉकेटरी आणि स्पेस रिसर्च क्षेत्रात नवनवीन आव्हाने स्वीकारण्याच्या आणि अधिक उंची गाठण्याच्या दिशेने आपला प्रवास सुरू ठेवावा. आमच्या विद्यार्थ्यांना भविष्यातील एरोस्पेस आणि स्पेस टेक्नॉलॉजी क्षेत्रातील क्षमता विकसित करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येतील असे या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधील टीम अनंतम - रॉकेटरी अँड स्पेस रिसर्च या विद्यार्थी संघाने 'एस्ट्रोवर्स अक्षयान २०२६' या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत सॉलिड रॉकेट मोटर लॉन्च कॅटेगरी मध्ये देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

पं. फिरोज दस्तूर हे घरंदाज गायकीवर प्रभुत्व असणारे व्यक्तिमत्त्व

■ पुणे (दै. संध्या)

डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशन संचालित स्वरमयी गुरुकुलच्या वतीने आयोजित 'किराना परंपरा' या विशेष कार्यक्रम मालिकेतील तेरावे सत्र संपन्न झाले. यात किराना घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. फिरोज दस्तूर यांच्या जीवनकार्याचा आणि वैशिष्ट्यपूर्ण गायकीचा वेध संगीत अभ्यासक डॉ. केशवचैतन्य कुंटे आणि डॉ. अतींद्र सरवडीकर यांनी घेतला. व्याख्यानासोबतच त्यांच्या गायकीच्या दुर्मिळ ध्वनिमुद्रिका ऐकण्याची संधी रसिकांना मिळाली.

पं. फिरोज दस्तूर हे शांत, अंतर्मुख आणि स्वरप्रधान गायकीचे तपस्वी होते. सवाई गंधर्व यांचे ज्येष्ठ शिष्य आणि भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांचे गुरुबंधू असलेल्या दस्तूर यांनी किराना घराण्याच्या गायकीचा समृद्ध वारसा समर्थपणे जपला. स्वरांची अचूकता, मधुर स्वराविष्कार, रागाचा विस्तार करण्यातील संयम आणि लय-लयकारीचे अचूक भान ही त्यांच्या गायकीची वैशिष्ट्ये होती. घरंदाज गायकीवरील त्यांचे प्रभुत्व त्यांच्या प्रत्येक सादरीकरणातून जाणवत असे, असे डॉ. केशवचैतन्य कुंटे यांनी प्रतिपादन केले. याप्रसंगी डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनच्या सचिव डॉ. भारती एम. डी., कार्यक्रम निर्देशक प्रसाद भडसावळे, गायिका अंजली दाणी, शीला देशपांडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात शुद्ध बिलावल, देसी, खंबावती, चंद्रमुखी, मारवा, भैरवी, दुर्गा आणि मल्हार अशा विविध रागांमधील त्यांच्या गायकीच्या ध्वनिमुद्रिका ऐकवण्यात आल्या. रागाचा विस्तार करताना स्वरांची मांडणी, प्रत्येक स्वराला दिलेले महत्त्व आणि आलापीतील संयतपणा यांतून त्यांच्या गायकीचे वेगळेपण उलगडले. रागविस्तारासाठी ते घेत असलेला वेळ, स्वरांची नेमकी निवड आणि गायकीतील सहजता यांमुळे त्यांच्या सादरीकरणाला स्वतंत्र सौंदर्य प्राप्त होत असे, असे डॉ. कुंटे आणि डॉ. सरवडीकर यांनी सांगितले.



पं. दस्तूर यांनी शास्त्रीय संगीताबरोबरच चित्रपटांसाठीही पार्श्वगायन केले होते. त्यांच्या चित्रपटगीतांच्या काही दुर्मिळ ध्वनिमुद्रिकाही या वेळी ऐकवण्यात आल्या. ख्याल, ठुमरी आणि भजन या गायनप्रकारांमध्येही त्यांचे प्रभुत्व होते. संगीतगुरू म्हणून त्यांनी दिलेले योगदान आणि किराना घराण्याची गायकी पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी केलेले कार्य महत्त्वाचे आहे, असे मत वक्त्यांनी व्यक्त केले. या सत्रात 'उगीच का कांता' हे नाट्यगीतही सादर करण्यात आले. दस्तूर यांची प्रसिद्ध रचना 'गोपाला' ऐकविण्याची रसिकांनी फर्माईश केल्यानंतर ती ध्वनिमुद्रिका ऐकवण्यात आली. 'जमुना के तीर' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भीमसेन जोशी अध्यासन केंद्राच्या माजी संगीत विभागप्रमुख डॉ. शुभांगी बहुलकर यांच्या हस्ते कलाकारांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वरमयी गुरुकुलचे कार्यक्रम निर्देशक प्रसाद भडसावळे यांनी केले.

कलाकृतींची 'प्रोत्साहन' प्रदर्शनातून पर्वणी

■ पुणे (दै. संध्या)

दोन्ही डोळ्यांनी दिसत नसतानाही वायर बॅग तयार करणे, मण्यांचे कंदील बनविणे तसेच विविध शोभेच्या वस्तू बनविणे, अशी कामे सहजतेने करत अंध व दिव्यांग व्यक्तींनी आपल्या जिद्दीची आणि कौशल्याची झलक पुणेकरांसमोर सादर केली. त्यांच्या हातून साकारलेल्या वस्तूंमधून केवळ कलागुणच नव्हे, तर स्वावलंबी होण्याची उमेद आणि आत्मविश्वासही दिसून आला. पुणेकरांनीही या वस्तूंची खरेदी करत अंधभगिनींच्या कलेला आणि प्रयत्नांना 'प्रोत्साहन' दिले.

दिव्यांग व्यक्तींमधील कौशल्यांना व्यासपीठ मिळावे, त्यांनी स्वावलंबी व्हावे आणि समाजाला त्यांच्या क्षमतांची ओळख व्हावी, या उद्देशाने पुण्यातील समविचारी मैत्रिणींनी एकत्र येत 'प्रोत्साहन २०२६' या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. शनिवार, दि. १० ऑक्टोबर पर्यंत सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत कर्वे रस्त्याजवळील अश्वमेध हॉल येथे हे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध भागांतील ३० दिव्यांग व्यक्ती आणि ८ संस्था या प्रदर्शनात सहभागी झाल्या असून प्रदर्शनाला



विनामूल्य प्रवेश आहे.

प्रोत्साहन प्रदर्शनाचे उद्घाटन सेवासदन दिलासा कार्यशाळेच्या व्यवस्थापिका व म्युझिक थेरपिस्ट मेघना जोशी आणि विविध कलात्मक वस्तूंची निर्मिती करून उमंग क्रिएशन स्टुडिओ येथे विक्री करणाऱ्या यशस्वी उद्योजिका मूकबधीर उमा जोशी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रदर्शनाचे संयोजन रंजना आठल्ये, रेखा कानिटकर, आरती पटवर्धन, माधुरी पाटणकर, शुभदा करंदीकर, गीता पटवर्धन यांनी केले.

यावेळी दिव्यांग व्यक्तींनी करमणुकीचे कार्यक्रम देखील सादर केले. सन २००३ पासून दिव्यांग व्यक्ती, त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था आणि सामान्य नागरिक यांच्यात परस्पर संवाद व सहकार्य निर्माण करण्याच्या उद्देशाने समविचारी मैत्रिणींच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविला जात आहे. वय वर्षे १८ ते ८० या वयोगटातील विविध प्रकारचे अपंगत्व असलेल्या व्यक्तींना त्यांनी तयार केलेल्या कलात्मक व उपयुक्त वस्तू तसेच खाद्यपदार्थ मांडून त्यांची विक्री करण्याची संधी प्रदर्शनातून मिळते. दृष्टीहीन व्यक्ती प्रात्यक्षिक सादर करणार आहेत.

पुण्यात रंगणार 'पुणे लोकमान्य फेस्टिव्हल'; मनोरंजनाचा जल्लोष

■ पुणे (दै. संध्या)

नवरात्रोत्सवानिमित्त **शिवगर्जना प्रतिष्ठान आयोजित 'पुणे लोकमान्य फेस्टिव्हल – नवरात्र उत्सव २०२६'**चे आयोजन लोकमान्यनगर, जॉगिंग पार्कजवळ, नवी पेठ येथे करण्यात आले आहे. यंदाचे २९ वे वर्ष असून परंपरा आणि आधुनिकतेचा सुरेख समन्वय साधत पुणेकरांसाठी विविध सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल या महोत्सवात पाहायला मिळणार आहे. या महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते, निमंत्रक शुभांगी सातपुते आणि उत्सव अध्यक्ष डॉ. नरेश मित्तल हे आहेत.

रविवार, ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता भव्य उद्घाटन सोहळा व देवीची प्राणप्रतिष्ठापना होणार असून शौर्य ढोल-ताशा पथक हे विशेष आकर्षण असणार आहे. त्यानंतर १२ ऑक्टोबरला 'साई दरबार', १३ ऑक्टोबरला 'पाहणं तुम्ही म्हणाल तसं' लावणी कार्यक्रम, १४ ऑक्टोबरला 'गीतों का सफर', तर १५ ऑक्टोबरला लोकप्रिय 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

१६ ऑक्टोबरला महाकाली तांडव नृत्य लाईव्ह शो, १७ ऑक्टोबरला महिलांसाठी 'रास रिदम गरबा नाईट', १८ ऑक्टोबरला ग्रुप डान्स/सोलो डान्स स्पर्धा आणि १९ ऑक्टोबरला दांडिया कार्यक्रम होणार आहे. २० ऑक्टोबरला दसऱ्यानिमित्त रावणदहन, तर २५ ऑक्टोबरला कोजागिरी पौर्णिमेनिमित्त 'टेंशन खल्लास' हा विशेष कार्यक्रम होणार आहे.

विशेष म्हणजे महोत्सवातील सर्व कार्यक्रम नागरिकांसाठी विनामूल्य ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे पुणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन पुणे लोकमान्य फेस्टिव्हलच्या वतीने करण्यात आले आहे.

अध्यात्मिक आणि राष्ट्र धर्म विषयी ग्रंथप्रदर्शनाची अमूल्य पर्वणी !

■ पुणे (दै. संध्या)

महिषासुराच्या नाशासाठी अवतार घेणाऱ्या श्री दुर्गादेवीचा उत्सव म्हणजे नवरात्र ! नवरात्र हे देवीचे व्रत असून महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हे व्रत कुलाचार म्हणूनसुद्धा पाळले जाते. या व्रतात नऊ दिवस व्रतस्थ राहून देवीची मनोभावे आराधना केली जाते.सनातन संस्था धर्मशिक्षण,धर्मजागृती साठी कार्यरत असून ठिकठिकाणी विविध उपक्रमांच्या आयोजनातून समाजात प्रबोधन करत आहे. याचाच एक भाग म्हणून आकुर्डी (चिंचवड) येथील भवानी माता मंदिर आणि पुणे येथील 'चतुःशृंगी' या स्वयंभू जागृत शक्तीस्थानाच्या ठिकाणी सनातन निर्मित आध्यात्मिक ग्रंथ प्रदर्शन आणि सनातनची सात्त्विक उत्पादनांचे प्रदर्शन लावण्यात येणार आहे.

हे प्रदर्शन 11 ऑक्टोबर ते 19 ऑक्टोबर



दरम्यान चतुःश्रृंगी, पुणे येथे सकाळी 7 ते रात्री 9 पर्यंत आणि भवानी माता मंदिर,आकुर्डी येथे सकाळी 9 ते रात्री 9 पर्यंत खुले राहणार आहे. भाविकांनी आणि भक्तांनी याचा अधिकाधिक लाभ घावा असे आवाहन सनातन संस्थेचे प्रा.विठ्ठल जाधव यांनी केले आहे. सनातनच्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी ७०३८७१३८८३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

धर्मादाय वकील संघटनेतर्फे (पीटीपीए) मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)

धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे येथे पब्लिक ट्रस्ट प्रॅक्टिशनर्स असोसिएशन (पीटीपीए) म्हणजेच धर्मादाय वकील संघटनेतर्फे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, वकील तसेच इतर उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचा लाभ १०० हून अधिक व्यक्तींनी घेत मोफत नेत्र तपासणी करून घेतली.

या शिबिराचे उद्घाटन सह धर्मादाय आयुक्त दिनेश कोठलीकर, धर्मादाय उपायुक्त डॉ. राजेश परदेशी तसेच सहाय्यक धर्मादाय आयुक्त सुधीर कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवर अधिकाऱ्यांचीही नेत्र तपासणी करून शिबिराची सुरुवात करण्यात आली.

या प्रसंगी पीटीपीए धर्मादाय वकील संघटनेच्या अध्यक्षा ॲड. अमृता गुरव,



सचिव ॲड. रोहिणी पवार, उपाध्यक्ष ॲड. विजयकुमार केळेकर, खजिनदार ॲड. अश्विनी नलावडे, ॲड. दिलीप हांडे, ॲड. राजेश ठाकूर व माजी अध्यक्ष ॲड. शिवराज कदम-जहागीरदार, डोळे तपासणी साठी आलेले डॉ. सुलभा थोरात व इतर मान्यवर उपस्थित होते. धर्मादाय क्षेत्रात कार्यरत असलेल्या वकील, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. डोळ्यांची नियमित तपासणी, दृष्टीदोषाचे वेळीच निदान आणि आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश होता. पीटीपीए धर्मादाय वकील संघटनेतर्फे यापुढेही सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य, कायदेविषयक जनजागृती आणि समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतील.

पंजाब नॅशनल बँकेच्या सेवानिवृत कर्मचाऱ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

■ पुणे (दै. संध्या)

पंजाब नॅशनल बँकेच्या सेवानिवृत कर्मचाऱ्यांचा स्नेह मेळावा आणि पंजाब नॅशनल बँक रिटायरीज असोसिएशन, महाराष्ट्र पुणे सर्कल यांची वार्षिक सर्वसाधारण सभा आज श्री स्वामी कृपा हॉल कर्वे रोड येथे उत्साहात संपन्न झाली

या सभेच्या वेळी पंजाब नॅशनल बँक मंडल प्रमुख श्री देवेंद्र सिंग, ए.जी.एम दीपक गुप्ता ,व्ही.बी.माळगे , मुकुंद गोखले, एन.जी देवधर, आर पी अणावकर, एआयबीआरफ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष -भास्कर भावे, माणिक अडाणे,असद किल्लेदार, शामराव निकाळजे,रोहिणी खिस्ती आणि पुणे,नाशिक, कोल्हापुर व मुंबई येथून आलेले दोनशेहून आधिक माजी कर्मचारी उपस्थित होते

मंडल प्रमुख श्री. देवेंद्र सिंग यांनी आपल्या भाषणात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी बँकेच्या प्रगतीत दिलेल्या अमूल्य



योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, "सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निष्ठा, मेहनत आणि अनुभवामुळेच पंजाब नॅशनल बँक आज देशातील अग्रगण्य बँक म्हणून टिकून आहे.दीपक गुप्ता यांनी निवृत्त कर्मचाऱ्यांना बँकेच्या विशेष योजनांचा लाभ घ्यावा आणि नव्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन द्यावे, असे आवाहन केले.

नीतिन पारेगावकर यांनी पंजाब नॅशनल बँक रिटायरीज असोसिएशन पुणे येथील कार्याचा आढावा घेतला . सायबर सुरक्षा जनजागृती – या विषयावर योगीता कुदळे, सहायक पोलीस निरीक्षक यांनी मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या . सध्या सायबर गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. आपण कष्टाने साठवलेले पैसे कोणी चोरल्यास आपले व कुटुंबियांचे हाल होतात. केवळ आपणच सावधानता बाळगणे गरजेचे आहे.ज्येष्ठ नागरिकांनो, सावध राहा असा इशाराहि त्यांनी दिला. आजकाल फोन आणि मोबाईलद्वारे पैशांची फसवणूक होण्याचे प्रकार वाढत आहेत. बँकेतून किंवा पोलीस ठाण्यातून बोलत असल्याचे सांगून काही लोक पैसे मागतात किंवा भीती दाखवतात.अशा वेळी घाबरू नका. कोणालाही ओटीपी आणि एटीएम पिन सांगू नका व खोट्या जाहिरातींना भुलू नका, अनोळखी लिंक उघडू नका आणि कोणाच्याही सांगण्यावरून पैसे पाठवू नका. फसवणूक झाल्यास लगेच १९३० या क्रमांकावर फोन करा. लक्षात ठेवा, सावधगिरी हाच सुरक्षिततेचा मार्ग आहे!

यावेळी मंडळ प्रमुखांच्या हस्ते. श्रीमती गीता वैद्य:, विवेक बोरवणकर, रवी वेलणकर: नितीन पारेगावकर: आणि विलास वर्तक यांचा विशेष कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. श्री. मुकुंद गोखले,श्री. आर.पी. अणावकर भास्कर भावे यांनी मनोगते व्यक्त केली अरुणा तिवारी यांनी सुत्र संचालन केले तर प्रदीप काळे यांनी आभार मानले .

थोडक्यात पण महत्वाचे

गणेश आचार्य यांच्या 'गणेश डस्ट टू स्टारडस्ट'चा दमदार ट्रेलर प्रदर्शित



पुणे : दैनिक संध्या

स्वप्नं मोठी असतील आणि ती पूर्ण करण्याची जिद्द असेल, तर प्रतिकूल परिस्थितीवरही मात करता येते, हा प्रेरणादायी संदेश घेऊन येणाऱ्या 'गणेश डस्ट टू स्टारडस्ट' या आगामी चित्रपटाचा दमदार ट्रेलर प्रसिद्ध कोरिओग्राफर आणि दिग्दर्शक गणेश आचार्य यांनी प्रदर्शित केला आहे. भावना, संघर्ष, नृत्य आणि दृढनिश्चय यांचा संगम असलेला हा चित्रपट ११ डिसेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाची घोषणा आणि पहिले पोस्टर प्रदर्शित झाल्यानंतर ट्रेलरमुळे या चित्रपटाविषयीची उत्सुकता वाढली आहे. शिवांशु सोनी, आलोक शॉ, सुकन्या कलान आणि साक्षी पावस्कर यांच्या भूमिका या चित्रपटात पाहायला मिळणार आहेत. साध्या परिस्थितीतून मोठी स्वप्नं पाहणाऱ्या व्यक्तींचा प्रवास आणि ती स्वप्नं साकार करण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हा चित्रपटाचा मुख्य विषय आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये महत्त्वाकांक्षा, जबाबदाऱ्या, त्याग आणि कठीण प्रसंगांवर मात करून पुढे जाण्याची जिद्द प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. नृत्याची ऊर्जा, भावनिक प्रसंग आणि नाट्यमय घडामोडी यांमुळे ट्रेलर लक्षवेधी ठरतो. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी स्वतःवरील विश्वास आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या बळावर यशाचे शिखर गाठता येते, हा विचार चित्रपटातून मांडण्यात आला आहे.

रुबी हॉल क्लिनिकतर्फे मानसिक आरोग्य जनजागृती उपक्रम; स्वतंत्र हेल्पलाइन सुरू



पुणे : दैनिक संध्या

रुबी हॉल क्लिनिकच्या मानसिक आरोग्य विभागातर्फे ५ ते १० ऑक्टोबरदरम्यान कर्मचाऱ्यांसाठी मानसिक आरोग्य जनजागृती आणि सहभाग उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त १० ऑक्टोबर रोजी वेलनेस फेअरचे आयोजन करून या उपक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र मानसिक आरोग्य संकट हेल्पलाइनही सुरू करण्यात आली. मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे, तणाव व्यवस्थापनासाठी आरोग्यदायी सवयी विकसित करणे आणि सहकाऱ्यांमधील संवाद व परस्परसंबंध दृढ करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. मेडलेर्न ॲपद्वारे उपलब्ध करून दिलेल्या स्वयं-अभ्यासक्रमात मानसिक आरोग्याची मूलभूत माहिती, गैरसमज, सुरुवातीची लक्षणे आणि गरजेच्या वेळी स्वतःला व इतरांना आधार देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ६ ते ९ ऑक्टोबरदरम्यान 'पास इट ऑन', 'वॉक अँड रिसेट', 'कनेक्ट बियॉन्ड वर्क' आणि 'टीम टाइम-आउट' यांसारखे विभागनिहाय उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये कृतज्ञता व्यक्त करणे, सजगतेसाठी विश्रांती घेणे, सहकाऱ्यांशी संवाद साधणे आणि संघभावना वाढविणे यावर भर देण्यात आला. वेलनेस फेअरमध्ये तणावाचे आत्मपरीक्षण, विश्रांतीसाठी सर्जनशील कृती आणि जीवनशैलीविषयक मार्गदर्शन देणारे स्टॉल्स उभारण्यात आले. फिजिओथेरपिस्ट आणि आहारतज्ज्ञांनी शारीरिक स्वास्थ्य, तणाव व्यवस्थापन आणि संतुलित आहाराबाबत माहिती दिली. रुबी हॉल क्लिनिकच्या मानसिक आरोग्य विभागाचे प्रमुख डॉ. हमजा हुसेन यांनी सांगितले की, मानसिक आरोग्य हा सर्वांगीण स्वास्थ्याचा महत्त्वाचा भाग आहे. कर्मचाऱ्यांना संकोच न बाळगता मदत मागता यावी आणि सुरक्षित, संवेदनशील कार्यसंस्कृती निर्माण व्हावी, यासाठी हे प्रयत्न करण्यात आले. उपक्रमाच्या शेवटी उत्कृष्ट सहभाग नोंदविणाऱ्या विभागासह सहभागी कर्मचाऱ्यांना पारितोषिके देण्यात आली.

एमपीएससीद्वारे कर्मचारी भरती यासाठी रोहित पवारांनी आंदोलन करावे



पुणे : दैनिक संध्या

पैसा आणि सोशल मीडिया याचा वापर करून तरुणांना रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांच्या उशाला प्रतिक्विंटल पाच हजार रुपये भाव मिळावा आणि राज्यातील खाजगी शिक्षण संस्थांमध्ये राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून नोकऱ्या मिळाव्या यासाठी आंदोलन करावे आम्ही त्यांचे नेतृत्व मान्य करू अशी मागणी शेतकरी नेते सदाभाऊ खोत यांनी पत्रकारांशी बोलताना केली. पुण्यात शास्त्री रस्ता अहिल्या अभ्यासिका येथे एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाला भेट देऊन सदाभाऊ यांनी विद्यार्थ्यांचे प्रश्न जाणून घेतले. वर्णनात्मक परीक्षेमध्ये घोटाळा होत असल्याने ऑब्जेक्टिव्ह पद्धतीने परीक्षा घेण्यात यावी एमपीएससीच्या परीक्षा वेळेवर आणि पारदर्शक पद्धतीने व्हाव्या, अशी विद्यार्थ्यांची मागणी योग्य असून या सर्व मागण्या सकट सरकारने एमपीएससीच्या माध्यमातून तयार झालेल्या सर्व जागा भराव्या या, मात्र काही जण स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी मागण्या मान्य केल्या आहेत, मात्र काही जण आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी तरुणांना भडकावून रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा आरोप सदाभाऊ खोत यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाची खरी ओळख करून घ्यायची असेल तर सार्थी किंवा महाज्योती अशा योजनांचा लाभ घेऊन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जाऊन भेटावे सरकारला विनाकारण घेण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन देखील सदाभाऊ खोत यांनी केले.

जपानच्या पर्यटन अभ्यासासाठी अमित कुलकर्णी यांची निवड

पुणे : दैनिक संध्या



जपानमधील पर्यटनाच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यासाठी पुण्यातील 'गेट सेट गो हॉलिडेज'चे संस्थापक आणि अनुभवी टूर लीडर अमित कुलकर्णी यांची 'व्हीजेटीएम जपान २०२६' या आंतरराष्ट्रीय पर्यटन उपक्रमासाठी निवड झाली. जपान नॅशनल टुरिझम ऑर्गनायझेशनच्या (जेएनटीओ) विशेष निमंत्रणावरून त्यांनी या उपक्रमात भारताचे प्रतिनिधित्व केले. या सन्मानाबद्दल अमित कुलकर्णी यांच्यासह संचालिका मनीषा निश्चल, अस्मि कुलकर्णी यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या कार्यक्रमात २२ देशांतील पर्यटन क्षेत्रातील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. भारतातून निवड झालेले कुलकर्णी हे या समूहातील एकमेव भारतीय पर्यटन प्रतिनिधी होते. जपानमधील पर्यटन संस्था, स्थानिक पर्यटन मंडळे, हॉटेल्स आणि अनुभवाधारित पर्यटन सेवांशी संवाद साधण्याची संधी त्यांना मिळाली. या दौऱ्यात इकोहॉ, निक्को, ओया हिस्ट्री म्युझियम, बांबू फार्म, बांबू हस्तकला कार्यशाळा आणि साके मद्यनिर्मिती केंद्रांना भेट देण्यात आली. जपानची संस्कृती, खाद्यपरंपरा, ग्रामीण पर्यटन, स्थानिक उद्योग आणि इतिहासाचा जवळून अभ्यास करण्यात आला. "जपानची ओळख केवळ टोकियो, माउंट फुजी किंवा बुलेट ट्रेनपुरती मर्यादित नाही. तेथील संस्कृती, स्थानिक जीवनशैली आणि वैशिष्ट्यपूर्ण अनुभव भारतीय पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. या सहभागामुळे भारतीय पर्यटकांसाठी जपानमधील नवीन पर्यटनस्थळे आणि वेगळे अनुभव देणाऱ्या सहली विकसित करण्यास मदत होणार आहे. तसेच भारत-जपान पर्यटन संबंधांना बळकटी मिळण्याची अपेक्षा आहे," असे अमित कुलकर्णी यांनी सांगितले.



बांधकाम मजुरांच्या गुणवंत मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियातर्फे उल्लेखनीय यशाबद्दल सन्मान; सहाय्यक कामगार आयुक्तांचा गौरवोद्गार

■ पुरंदर (दै. संध्या)

आई-वडील दिवसभर बांधकामावर डोक्यावर विटा वाहतायेत, ओझी उचलताहेत... त्याच गोंधळात मुले एखाद्या मातीच्या ढिगाऱ्यावर बसून किंवा लहानशा खोलीत बसून अभ्यास करताहेत... हे चित्र आपण आजूबाजूला बांधकामाच्या ठिकाणी पाहतो. प्रतिकूल परिस्थितीतही आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत मेहनतीने अभ्यास करुन दहावी, बारावी, पदवी आणि उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे यश खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे. हेच लक्षात घेऊन बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) पुणे केंद्राच्या वतीने बांधकाम कामगारांच्या गुणवंत मुलांचा सत्कार करुन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी खास सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर सहाय्यक कामगार आयुक्त दत्तात्रय पवार, अजयश्री सोशल फाऊंडेशनचे संचालक अजयकुमार लोळगे, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, पुणेचे अध्यक्ष अजय गुजर, उपाध्यक्ष राजाराम हजारे, सचिव महेश राठी व कोषाध्यक्ष सुशील अग्रवाल उपस्थित होते. यावेळी संस्थेचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष रणजीत मोरे, महाराष्ट्र प्रदेश माजी अध्यक्ष जगन्नाथ जाधव, सुनील मते, पुणे कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष रविंद्र भोसले व रयत शिक्षण संस्थेच्या पुणे विभाग सदस्य व निसर्ग ऋण फाऊंडेशनच्या अध्यक्ष अर्चना सोनावणे आदी उपस्थित होते.

दत्तात्रय पवार म्हणाले, बांधकाम कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षण घेता यावे, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे आणि कामगार कुटुंबांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. पात्र बांधकाम कामगारांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी मंडळाकडे नोंदणी करून नोंदणीचे वेळोवेळी नूतनीकरण करावे. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या यशाचे कौतुक करणे, हा या उपक्रमाचा स्तुत्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. शैक्षणिक मदतीबरोबरच बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मातृत्व लाभ, सामाजिक सुरक्षा आणि निवृत्तीवेतनाशी संबंधित योजनांचाही उल्लेख करण्यात आला. बांधकाम कामगारांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळाल्यास त्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीला हातभार लागू शकतो. त्यामुळे कामगारांनी शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व लाभ घ्यावा. आयुष्यात यश मिळवायचे असेल तर कष्ट आणि शिक्षण यांना पर्याय नाही असेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले.अजयकुमार लोळगे म्हणाले, बिल्डर्स असोसिएशनच्या माध्यमातून कन्स्ट्रक्शन करत असताना कन्स्ट्रक्टीव्ह काम होते ही अतिशय आनंदाची बाब आहे. विद्यार्थ्यांना या सत्कारासोबतच मार्गदर्शन, शैक्षणिक सहकार्य आणि इंटर्नशिपसारख्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, असेही त्यांनी सुचवले. विद्यार्थ्यांनीही आपल्या क्षमतेनुसार इतरांना मदत करण्याची भावना जोपासावी. शिक्षण घेत असताना मिळणारे ज्ञान, कौशल्य आणि अनुभव समाजाच्या उपयोगी आणण्याचा प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा आणि त्यांच्या भविष्यातील करिअरला दिशा मिळावी, यासाठी इंटर्नशिप कार्यक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात, असे त्यांनी नमूद केले. संस्थेचे अध्यक्ष अजय गुजर प्रास्ताविक करताना म्हणाले, पाया भक्कम असेल तर इमारत भक्कम होते. त्याचप्रमाणे शिक्षणाचा पाया भक्कम असेल तर आयुष्य चांगले आकार घेते. आपण कोणाची मुले आहोत हे न पाहता मेहनत, स्वप्न मोठी ठेवावीत आणि त्या स्वप्न पूर्ण होण्यासाठी कष्ट घ्यावेत. बिल्डर्स असोसिएशन नेहमीच बांधकाम मजूर आणि त्यांच्या मुलांच्या कल्याणासाठी उपक्रम राबवित असते.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष व कार्यक्रम समन्वयक राजाराम हजारे, अभियंता मित्र मासिकाचे संपादक डॉ. कमलकांत वडेलकर यांनी मनोगत व्यक्त केले. महेश राठी यांनी आभार मानले आणि संजय आपटे, मधुर डागा यांनी सूत्रसंचालन केले.

वेतनप्रश्नी डॉ. विशाल कडणे यांच्या पाठपुराव्याला यश!

■ Authorization TAB सुरू करण्यास परवानगी

■ प्रत्यक्ष कार्यवाहीसाठी पाठपुरावा सुरू

■ मुंबई : (दै. संध्या)



मुंबईतील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित सुरू राहावे, या मागणीसाठी मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे संचालक डॉ. विशाल कडणे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला महत्त्वाचे यश मिळाले आहे. Authorization TAB सुरू करण्यासाठी आवश्यक परवानगी आदेश प्राप्त झाला असून, आता प्रत्यक्ष TAB सुरू करून वेतनप्रक्रिया सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. "शिक्षक अतिरिक्त नाहीत, तर उपलब्ध आहेत!" ही डॉ. विशाल कडणे यांची सुरुवातीपासूनची ठाम भूमिका राहिली आहे. उपलब्ध शिक्षकांचे मुंबईतील शाळांमध्ये समायोजन करावे, त्यांचे वेतन नियमित सुरू ठेवावे आणि कोणत्याही शिक्षकावर वेतन बंद होण्याची वेळ येऊ नये, यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी डॉ. विशाल कडणे यांनी शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर साहेब यांची वारंवार भेट घेऊन चर्चा केली. तसेच मंत्रालय, शिक्षण आयुक्त कार्यालय आणि शिक्षण संचालक कार्यालय या प्रशासकीय स्तरांवरही सातत्याने पाठपुरावा केला. १७ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या या प्रयत्नांना २३ दिवसांनंतर महत्त्वाचे यश मिळाले असून, Authorization TAB सुरू करण्यासाठी आवश्यक परवानगी प्राप्त झाली आहे. त्यामुळे अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनप्रक्रियेला गती मिळण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. मात्र, केवळ परवानगी मिळणे हा अंतिम टप्पा नसून प्रत्यक्ष Authorization TAB सुरू होऊन वेतनप्रक्रिया सुरळीत होणे आवश्यक आहे. यासाठी शालार्थ टीमच्या स्तरावर पाठपुरावा सुरू असून, सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यांचे वेतन वेळेत मिळावे, यासाठी मुंबई शहर शिक्षक विकास मंडळ प्रयत्नशील आहे. "शिक्षकांचे समायोजन करा; मात्र त्यांचे वेतन थांबवू नका. शिक्षक अतिरिक्त नसून ते शिक्षणव्यवस्थेतील उपलब्ध मनुष्यबळ आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा उपयोग मुंबईतील शाळांमध्ये करून घ्यावा. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक सुरक्षिततेला बाधा न आणता समायोजनाची प्रक्रिया पूर्ण करावी," अशी भूमिका डॉ. विशाल कडणे यांनी मांडली. Authorization TAB सुरू करण्यासाठी परवानगी मिळणे हा सकारात्मक टप्पा असला, तरी प्रत्यक्ष वेतनप्रक्रिया पूर्ण होऊन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतन जमा होईपर्यंत पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे मंडळाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. शिक्षकांच्या हक्कासाठी, त्यांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी आणि शैक्षणिक व्यवस्थेतील उपलब्ध मनुष्यबळाचा योग्य वापर व्हावा यासाठी मुंबई शहर शिक्षक विकास मंडळ कटिबद्ध आहे.

'कुकाई' या भयपटातुन अंकुश चौधरी वेगळ्या भूमिकेत झळकणार!!

■ पुणे : (दै. संध्या)



आजवर अनेक चित्रपटांतून दमदार भूमिका केलेला अभिनेता अंकुश चौधरी आता "कुकाई" या भयपटातून वेगळ्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीत भयपटांचे प्रयोग तुलनेने कमी झाले आहेत. त्यामुळे "कुकाई" हा भयपट, अंकुश चौधरीची वेगळी भूमिका असा योग या निमित्ताने जुळून आला आहे. नुकतेच घटस्थापनेच्या मुहूर्तावर या चित्रपटाची घोषणा सोशल मीडियाच्या माध्यमातून करण्यात आली.

स्वरुप स्टुडिओज आणि देवी सातेरी प्रॉडक्शन्स हे चित्रपटाची निर्मिती करत असून प्रभाकर परब, सचिन नारकर, विकास पवार हे चित्रपटाचे निर्माता आहेत, तर अभिनेत्री जान्हवी किल्लेकर तिच्या जान्हवी प्रॉडक्शन या निर्मिती संस्थेद्वारे प्रथमच सहनिर्माती म्हणून पदार्पण करत आहे. शब्बीर नाईक यांनी कथालेखन आणि दिग्दर्शन केले आहे. आशिष टिळक आणि शब्बीर नाईक यांनी पटकथा आणि संवाद लेखन केले आहे. रोहन मडकईकर छायांकन, चिनार महेश संगीत दिग्दर्शन तर अतुल साळवे कार्यकारी निर्माता म्हणून काम पाहत आहेत.

सुप्रसिद्ध अभिनेता अंकुश चौधरींसह या चित्रपटाच्या निमित्ताने कोण भेटीला येणार त्यांची नावे मात्र अजून गुलदस्त्यात ठेवण्यात आली आहेत.अभिनेता अंकुश चौधरीने त्याच्या प्रत्येक चित्रपटातून वेगळे काहीतरी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे "कुकाई" या चित्रपटातून अंकुश कोणत्या रुपात प्रेक्षकांसमोर येतो याची उत्सुकता वाढली आहे. त्याशिवाय अभिनेत्री जान्हवी किल्लेकरने आजवर अभिनेत्री म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली असून आता सहनिर्माती म्हणून ती नवी जबाबदारी उचलत तिने "कुकाई" या वेगळ्या धाटणीच्या चित्रपटाची निवड केली आहे.

विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी तंत्रज्ञान, नवकल्पना व लोकसहभाग महत्वपूर्ण

■ पुणे : (दै. संध्या)



"देशाच्या विकासासाठी तंत्रज्ञान, नवकल्पना आणि लोकसहभाग यांची सांगड घालणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या काही वर्षांत आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेवर भर दिला असून, त्याद्दष्टीने स्वदेशी उद्योग आणि व्यवसायांना सरकारकडून प्रोत्साहन दिले जात आहे. स्टार्टअप इंडिया, स्टँडअप इंडिया, मेक इन इंडिया यामधून मोदीजींनी स्वदेशी उद्योग आणि स्थानिक उत्पादनांना चालना दिली आहे. देशातील युवापिढीने नवतंत्रज्ञान, कौशल्ये आत्मसात करीत नवकल्पना साकारत विकासप्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा," असे प्रतिपादन केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री डॉ. राज भूषण चौधरी यांनी केले.

आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीजच्या वतीने आयोजित 'एडब्ल्यूटीआयएस २०२६', या तंत्रज्ञान व नवकल्पनाविषयक तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपावेळी डॉ. राज भूषण चौधरी बोलत होते. हिंजवडीतील हॉटेल विवांता येथे आयोजित या कार्यक्रमावेळी आर्यन्स ग्रुपचे अध्यक्ष मुकुंद जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोहर जगताप, सहकार्यकारी अध्यक्ष स्मिता शितोळे-जगताप, 'इस्त्रो'चे संचालक डॉ. एस. व्यंकटेश्वरा शर्मा, डिफेन्स प्रोग्राम तज्ज्ञ महेश शेळके, सायबर सिक्युरिटी तज्ज्ञ मिलिंद पटनायक, 'आर्यन्स ग्रुप'चे संचालक अजय जगताप, सागर कानडे आदी उपस्थित होते. डॉ. राज भूषण चौधरी म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून भारत आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल करीत आहे. अंतराळ तंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि जलव्यवस्थापन क्षेत्रातील नवकल्पना देशाच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या ठरतील. तसेच हायड्रोजन ऊर्जेचा वापर वाढवून पारंपरिक इंधनावरील अवलंबित्व कमी करणे आणि पर्यावरणपूरक विकास साधणे आवश्यक आहे. आर्यन्स ग्रुपकडून अंतराळ तंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि डिजिटल क्षेत्रात सुरू असलेले काम महत्त्वपूर्ण आहे. अशा परिषदांमुळे नवउद्योजक आणि तरुणांना नवनवीन संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रेरणा मिळते. 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' या संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे गरजेचे आहे." डॉ. एस. व्यंकटेश्वरा शर्मा यांनी 'इस्त्रो'च्या विविध अवकाश मोहिमांविषयी माहिती दिली. डॉ. शर्मा म्हणाले की, अंतराळाचा सुरक्षित आणि शाश्वत वापर सुनिश्चित करण्यासाठी जागतिक सहकार्य, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रभावी कचरा व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. अंतराळातील निकामी उपग्रह आणि रॉकेटचे अवशेष ही भविष्यातील अंतराळ मोहिमांसमोरील गंभीर समस्या आहे. या कचऱ्यामुळे कार्यरत उपग्रहांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे निकामी उपग्रहांना पृथ्वीच्या वातावरणात आणून नष्ट करणे किंवा सुरक्षित कक्षेत हलविणे आवश्यक आहे. नासा, इस्रो, युरोपियन स्पेस एजन्सी आणि जपानची अंतराळ संस्था यांसह जगभरातील संस्था या समस्येवर उपाय शोधत आहेत, असेही त्यांनी नमूद केले. समारोपीय भाषणात मनोहर जगताप यांनी सांगितले की, "या तीन दिवसीय परिषदेत तंत्रज्ञान, संशोधन, नवकल्पना, संरक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षेसारख्या विषयांवर विचारमंथन झाले. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या सहभागामुळे उद्योग, संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील समन्वयाला चालना मिळण्यास मदत झाली. या परिषदेच्या पुढचा टप्पा नोव्हेंबरमध्ये होणार असून, यातुन 'आर्यन्स'च्या पुढील व्यावसायिक वाटचालीला आणखी गती मिळेल. हायड्रोजन अर्थव्यवस्था, अंतराळ प्रक्षेपकांची इंजिने आणि प्रगत तंत्रज्ञानावर आधारित उत्पादने पुढील टप्प्यात प्रदर्शित केली जाणार आहेत. 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' संकल्पनांना चालना देत देशाच्या औद्योगिक व आर्थिक विकासात योगदान देण्याचा आर्यन्स ग्रुपचा प्रयत्न आहे."



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



बैलपोळा म्हणजे बैला प्रति कृतज्ञता व्यक्त करणारा सण : नरेश जगताप

पिंपरी : दैनिक संध्या

वर्षभरात बैल शेतामध्ये काबाड कष्ट व घाम गाळून शेतकऱ्यांना मदत करत असतात बैला प्रति आदर, प्रेम व्यक्त करण्यासाठी शेतकरी बैलपोळ्याच्या दिवशी बैलांना अंघोळ घालून, शिंगणा रंग देऊन, बाशिंग बांधून,झुली घालून त्याची आम्ही वाजत गाजत मिरवणूक काढतो आणि बैलांना पुरणपोळी ही खाऊ घालतो. यावेळी पिंपळे गुरव येथील प्रगतशील शेतकरी नरेश जगताप म्हणाले की आमच्या बैल जोडीला संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचा ही मान मिळाला आहे हे आमच्या कुटुंबाचे खूप मोठे भाग्य आहे, परंतु आजकाल सिमेंटच्या जंगलामध्ये पशुधन पाळणे फार कठीण झालें आहे, पशुधनांना ठेवण्यासाठी नागरिकांकडे शहरात थोडीशी जागा शिल्लक राहिलेली नाही परंतु आज आम्ही हौसे खातर आणि या बैलामुळेच खूप मोठे झालो आहोत यांची आम्हा सर्वांना जाणीव आहे बैलांची कृतज्ञ म्हणून आम्ही बैलांना वर्षभर कोणतेही काम देता हौसे खातर पाळत आहोत आमच्या घरातील मुले व महिला त्यांची काळजी घेत असतात आमची नातवंडे स्वतः बैलांना धरतात परंतु ते काहीही करत नाहीत त्यामुळे कुटुंबाचे आणि आमच्या बैलांचे खूप घट्ट नाते निर्माण झाले आहे या भावनिक नात्यामुळेच आम्ही त्यांना विकू शकत नाही परंतु त्यांना सांभाळणे कठीण झाले असल्याची भावना शेतकरी नरेश जगताप यांनी यावेळी व्यक्त केली या वेळी नरेश जगताप, सौरभ जगताप, कुनाल जगताप गौरव जगताप,ओंमकार जगताप, सुमित जगताप,दत्ता जगताप श्वेता जगताप, वृशाली जगताप इत्यादी घरातील सदस्य उपस्थित होते.

पुनावळे येथून कारमधील ५० लाखांची बॅग चोरणारे आरोपी ८ तासांत जेरबंद

रावेत: दैनिक संध्या

कारमध्ये ठेवलेली ५० लाख रुपयांची रोकड बनावट चावीच्या मदतीने चोरून नेणाऱ्या दोन आरोपींना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अवघ्या आठ तासांत ताब्यात घेतले आहे. गुन्हे शाखा युनिट-२, मालमत्ता विरोधी पथक आणि रावेत पोलिसांनी संयुक्त कारवाई करत चोरीस गेलेली संपूर्ण ५० लाख रुपयांची रक्कम हस्तगत केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १०.५० ते १२.१५ वाजण्याच्या सुमारास पुनावळे येथील संदीप हॉटेलसमोरील सिमेंटच्या सर्व्हिस रोडवर एक कार पार्क करण्यात आली होती. या कारचे दरवाजे बनावट चावीच्या साहाय्याने उघडून त्यामध्ये ठेवलेली ५० लाख रुपयांची रोकड असलेली बॅग चोरून नेण्यात आली. याप्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी गुन्हे शाखा आणि रावेत पोलिसांना तातडीने तपास करून गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले. त्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथके तयार करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजमुळे तपासाला दिशा पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये एक व्यक्ती बनावट चावीने कार उघडून ५० लाख रुपये असलेली बॅग घेऊन जात असल्याचे दिसून आले. पुढील तपासात फिर्यादीसोबत मुंबई येथे पैसे आणण्यासाठी गेलेल्या दोन व्यक्तींपैकी चारुदत्त शिवाजी बेंडाले याच्यावर संशय बळावला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने आपल्या मित्राला कारची बनावट चावी देऊन कारमध्ये ५० लाख रुपये असल्याची माहिती दिली आणि चोरी करण्यास सांगितल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी प्रसाद शिवाजी बनकर (वय २९, व्यवसाय सुपरवायझर, रा. चिंबळी, ता. खेड, जि. पुणे) आणि चारुदत्त शिवाजी बेंडाले (वय ३०, बांधकाम व्यवसाय, रा. निघोजे, ता. खेड, जि. पुणे) या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली. त्यांच्याकडून चोरीस गेलेली संपूर्ण ५० लाख रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे.

नवी सांगवीत मालमत्तेच्या वादातून आजीचा चाकूने वार करून खून;

पिंपरी : दैनिक संध्या

नवी सांगवी येथील क्रांती चौकातील शिंगोरे बिल्डिंगमध्ये मालमत्तेच्या वादातून एका वृद्ध महिलेची चाकूने वार करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मंगल बाबूराव शिंगोरे (वय ६०) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी सांगवी पोलिसांनी मृत महिलेचा सावत्र नातू ओंकार किसन शिंगोरे याला ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मालमत्तेत हिस्सा दिला जात नसल्याच्या रागातून ओंकार याने हे कृत्य केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. दोन ते तीन महिन्यांपूर्वी ऑनलाइन मागवलेल्या चाकूंच्या सेटमधील एका चाकूने त्याने आजीवर वार केल्याचे तपासात समोर आले आहे. आजीची हत्या केल्यानंतर आरोपी ओंकार शिंगोरे हा स्वतः सांगवी पोलीस ठाण्यात हजर झाला. त्याने पोलिसांसमोर गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीवर यापूर्वीही खून आणि खुनाचा प्रयत्न यांसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी मृत मंगल शिंगोरे यांच्या ३८ वर्षीय मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून सांगवी पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे नवी सांगवी परिसरात खळबळ उडाली आहे.

केएसबी चौकात ट्रॅक्टर आणि दुचाकीची धडक

पिंपरी : दैनिक संध्या

शहरातील केएसबी चौकाजवळ ट्रॅक्टर आणि दुचाकी यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात आठ वर्षांच्या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर तिचे आई-वडील गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, केएसबी चौकातील पुलावर ट्रॅक्टरची दुचाकीला जोरदार धडक बसल्याने हा भीषण अपघात घडला. या अपघातात दुचाकीवरील आठ वर्षीय चिमुकली हातिन फरान मोमीन हिचा मृत्यू झाला आहे. तर तिचे वडील फरान मोमीन (वय ३२), आई मारिना फरान मोमीन गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी निगडी येथील धनश्री हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, मृत मुलीचा मृतदेह पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातानंतर ट्रॅक्टर चालकाचा शोध सुरू करण्यात आला असून, त्याला ताब्यात घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या दुर्दैवी अपघातामुळे एका चिमुकलीचा जीव गेला.

३३ वर्षांपासून रखडलेला रिंगरोड प्रकल्प अधांतरी

■ पिंपरी: (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरात सार्वजनिक वाहतुकीस चालना देण्यासाठी 31.40 किलोमीटर अंतराचा उच्च क्षमता द्रुतगती वर्तुळाकार मार्गाचा (एचसीएमटीआर-हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झिट रूट) (रिंगरोड) प्रकल्प 33 वर्षांपासून धूळ खात पडला आहे. वारंवार त्यात बदल करण्यात आले. त्यातील काही ठिकाणी बीआरटीएस धावत असून, मेट्रो व ई-आरटीएस प्रस्तावित आहे. निओ मेट्रोऐवजी ई-आरटीएसचा स्वस्त व सोईस्कर पर्याय लक्षात घेता एचसीएमआरटी मार्गावर ती सेवा निर्माण करण्याचा प्रशासनाचा विचार आहे. काही भागात नागरिकांचा या प्रकल्पास विरोध आहे. वारंवार अडथळे निर्माण होत असल्याने हा प्रकल्पाचे भवितव्य अधांतरी दिसत आहे.



शहरातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी तसेच, नागरिकांमध्ये खासगी वाहनांचा वापर कमी करण्यासाठी एचसीएमटीआर या सार्वजनिक वेगवान वाहतूक सेवेचा पर्याय सन 1993 ला समोर आला होता. त्याचा डीपी अहवाल तयार करण्यात आला. तब्बल 33 वर्षांपासून भिजत पडलेला हा प्रकल्प अखेर, सन 2019 मध्ये पुन्हा बाहेर काढण्यात आला. महामेट्रोकडून त्या प्रकल्पाचा डीपीआर तयार करून घेण्यात आला. त्याकरिता सुमारे 5 कोटींचा खर्च झाला. डीपीआरच्या मार्गात काही बदल व सुधारणा करून तो डीपीआर तत्कालिन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी महापालिका पदाधिकाऱ्यांसमोर सादर केला. तो डीपीआर तत्कालिन दिवगंत उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्यासमोर तत्कालिन आयुक्त राजेश पाटील यांनी 19 जानेवारी 2021 ला सादर केला. त्यांनी सूचना केल्यानंतर त्यात पुन्हा बदल करण्यात आले. तत्कालिन आयुक्त शेखर सिंह यांनी तो डीपीआर राज्य सरकार समोर मांडला होता. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरही आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी डीपीआरचे सादरीकरण केले आहे. एचसीएमटीआरऐवजी ई-आरटीएस मार्गास मुख्यमंत्र्यांनी होकार दिला आहे. त्यानुसार, बोऱ्हाडेवाडी, मोशी ते वाकड चौक मार्गावर सुमारे 17 किलोमीटर अंतराची ई-आरटीएस सेवा निर्माण केली जाणार आहे. तर, काही मार्गावर मेट्रोचे नियोजन करण्यात आले आहे. काही मार्गावर बीआरटीएस तयार आहे. मात्र, संपूर्ण एचसीएमटीआर मार्गाबाबत ठोस निर्णय होत नसल्याने हा प्रकल्पाची गरज आहे की संपली, असा प्रश्न निर्माण होत आहे. शहरात दापोडी ते पिंपरी मेट्रो धावत आहे. तो मार्ग निगडीपर्यंत विस्तारीत करण्याचे काम सुरू आहे. तसेच, निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक ते चाकण असा 47. 295 किलोमीटर अंतराचा मेट्रोचा नवीन मार्ग आहे. तसेच, बोऱ्हाडेवाडी ते वाकड चौक असा ई-आयटीएस प्रकल्पाची नवीन संकल्पना राबवण्यात येत आहे. महापालिका, मेट्रो, बीआरटीएस, ई-आयटीएस यंत्रणेत ताळमेळ नसल्याने एचसीएमटीआर प्रकल्प बारगळला आहे. नवनव्या संकल्पनेमुळे एचसीएमटीआर मार्गाचे तुकडे होत असल्याचे चित्र आहे. काही भागांत दाट लोकवस्ती निर्माण झाली आहे. घरे पाडून मार्ग तयार करण्यास शहरातून मोठा विरोध होऊ शकतो. त्यामुळे नियोजित संपूर्ण कामांवर एचसीएमटीआर साकार करण्यास महापालिकेस मोठ्या विरोधाचा सामना करावा लागणार आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप सुधारित विकास आराखड्यावर (डीपी प्लॅन) सुनावणी सुरू आहे. त्या डीपीत एचसीएमटीआरचा मार्ग दर्शवण्यात आला आहे. त्या डीपीवर शहरभरातून तब्बल 56 हजार 779 हरकती दाखल झाल्या आहेत. एससीएमटीआरबाबत चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, काळेवाडी, थेरगाव, रहाटणी आदी भागांतून 2 हजार 435 हकरती दाखल करण्यात आल्या आहेत. तो मार्ग कायमस्वरूपी रद्द करावा, अशी बाधित होणाऱ्या नागरिकांची मागणी आहे. त्याबाबत सुनावणी समिती काय निर्णय घेते याकडे शहराचे लक्ष लागले आहे. तीस मीटर रुंदीचा हा 31.40 किलोमीटर अंतराचा एचसीएमआरटीचा एलिव्हेटर (उन्नत) डीपीआर तयार करण्यात आला आहे. नाशिक फाटा, पिंपळे गुरव, सुदर्शननगर, कोकणे चौक, काळेवाडी फाटा, तापकीर चौक, पीसीएमसी-वेंगसरकर क्रिकेट अॅकॅडमी, संचेती स्कूल, क्रांतिवीर नगर, थेरगाव बिर्ला रुग्णालय, वाल्हेकरवाडी, रानमळा हॉटेल, स्पाइन रस्ता, रेलविहार चौक, आकुर्डी रेल्वे स्थानक, निसर्ग दर्शन सोसायटी, गायरान, निगडी भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक, स्पाइन रस्ता त्रिवेणीनगर, रूपीनगर, टाटा मोटर्स, जॅग्वार कंपनी (मर्झिडीझ बेंझ) समोरून इंद्रायणीनगर, स्वामी समर्थ स्कूल, संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणी चौक, टेल्को रस्ता, सेंच्युरी एन्का, लांडेवाडी असा मार्ग आहे. डीपीआरमध्ये एचसीएमआरटीचा मार्ग एलिव्हेटर दर्शवण्यात आला आहे. त्यासाठी निओ मेट्रोचा पर्याय ठेवण्यात आला होता. त्यानुसार, महामेट्रोने डीपीआर तयार केला. निओ मेट्रो ही टायरबेस असलेली तीन कोचची इलेक्ट्रिक वाहन आहे. एकदा चार्ज झाल्यानंतर ती 50 ते 60 किलोमीटर अंतर धावते. त्यासाठी लोहमार्ग टाकण्याचा खर्च वाचतो. एका वेळी 700 ते 750 प्रवासी यातून प्रवास करू शकतात. मात्र, निओ मेट्रोचा पर्याय गुंडाळण्यात आला आहे. निगडीच्या भक्ती-शक्ती चौक ते चाकण असा 47.295 किलोमीटर अंतराचा सुधारित डीपीआर तयार करण्यात आला. त्याला महापालिका सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे. शहरातील एचसीएमटीआर निओ मेट्रो मार्गासाठी एकूण 2 हजार 300 कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तो प्रकल्प पीपीपी, बीओटी, केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने की म्युन्सिपल बॉण्ड काढून करायचा, याबाबत अद्याप एकमत झालेले नाही.

नेतेमंडळीच्या फायद्यासाठी प्रकल्प कागदावर

तब्बल 400 कोटी रुपये खर्चाचा हा एचसीएमटीआर रिंग रेल्वे प्रकल्प पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आर्थिक क्षमतेच्याबाहेर होता. सन 1980 ते 1992 च्या काळात जागतिक बँकेच्या मदतीशिवाय हा प्रकल्प अस्तित्वात येऊ शकत नव्हता. सन 1995 च्या डीपी अहवालात तशी नोंद आहे. त्यामुळे हा प्रकल्प फक्त नकाशातच राहिला. हा प्रकल्प कालबाह्य ठरला आहे. महापालिकेच्या नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर टीडीआर वाटप केल्यामुळे हा प्रकल्प राजकीय नेत्यांच्या आर्थिक लाभासाठी आजही कागदावर आहे. जो भविष्यात राबवला जाईल असे वाटत नाही, असे विजयकुमार पाटील यांनी सांगितले. एचसीएमटीआर मार्ग हा निओ मेट्रो म्हणून डीपीआर तयार करण्यात आला होता. त्याच वेळी दाट लोकवस्तीऐवजी बीआरटी मार्गातून मार्गिका प्रस्तावित करण्यात आली होती. त्या प्रकल्पासाठी सध्या 65 टक्के जागा ताब्यात आहे. तर, सुमारे 30 टक्के मार्गावर मेट्रोची मार्गिका होणार असल्याने तेथे एचसीएमटीआरची गरज राहणार नाही. मात्र, नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध राहणार आहे. बोऱ्हाडेवाडी ते वाकड चौक असा ई-आरटीएस मार्ग तयार होऊन त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाल्यास एचसीएमटीआर हा ई-आयटीएस पद्धतीने विकसित करण्यात येईल, असे महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाचे सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड यांनी सांगितले.

निवृत्त पोलिस अधिकाऱ्यांचे 'अभूतपूर्व' स्नेहसंमेलन संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

महाराष्ट्र पोलिस दलातील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे नुकतेच स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. महात्मा फुले वसतिगृहाचे दरोडे सभागृह येथे आयोजित कार्यक्रमास पोलिस उपनिरीक्षक पदावर कारकीर्द सुरू करून सहायक पोलिस आयुक्त किंवा त्यावरील पदावर निवृत्त झालेले १५० अधिकारी उपस्थित होते. त्यात १० महिला अधिकाऱ्यांचा समावेश होता.



एकाच प्रशिक्षण तुकडीतील अधिकाऱ्यांची स्नेहसंमेलने अनेकदा होतात; मात्र अशा प्रकारचे संमेलन यापूर्वी कधीही झाले नव्हते, असे आयोजकांनी सांगितले. उपस्थितांमध्ये वयाने ज्येष्ठतम अधिकारी ९१ वर्षांचे, तर तरुणतम अधिकारी ५८ वर्षांचे होते. ३३ वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यापासून अवघ्या ३० दिवसांपूर्वी निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यापर्यंत सर्व जण एकाच व्यासपीठावर आले. निवृत्त सहायक पोलिस आयुक्त शेषराव सूर्यवंशी यांच्या संकल्पनेतून हे संमेलन साकारले. त्यांनीच कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाची सुरुवात 'रिट्रीट' या बिगुल कॉलने झाली. हा बिगुल कॉल सर्व पोलिस मुख्यालयांत सूर्यास्ताला ध्वज उतरवताना वाजवला जातो. सेवाकालाच्या समाप्तीनंतर आयुष्याच्या सायंकाळी होणाऱ्या स्नेहसंमेलनाची सुरुवात त्यामुळे अत्यंत समर्पक ठरली. सूत्रसंचालन सुरेंद्र देशमुख यांनी केले. यांचा हृदय सत्कार करण्यात आला. मधुकर झेंडे यांनी एनसीसी जीवनातील 'O My Darling Clementine' या गीताचा मराठी अनुवाद 'माझी लाडकी सुशीला' सादर करून उपस्थितांना चकित केले.तसेच आंतरराष्ट्रीय गुन्हेगार चार्ल शोभराज यास दोनवेळा कशाप्रकारे अटक केली हे सुद्धा विषद केले.

गणेश किसन आप्पा यादव बैलगाडा संघटनेचा बैलपोळा साजरा..!

■ चिखली(दै. संध्या)

महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीत महत्त्वाचे स्थान असलेला बैलपोळा सण गणेश किसन आप्पा यादव बैलगाडा संघटनेच्या वतीने कुदळवाडी, टाळगाव आणि चिखली परिसरात मोठ्या उत्साहात, जल्लोषात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या सणानिमित्त सजविलेल्या बैलांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशे आणि वाजंत्रीच्या गजरामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

बैलपोळा हा केवळ सण नसून शेतकऱ्यांच्या जीवनाशी जोडलेली भावना, कृतज्ञता आणि परंपरेचे प्रतीक आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांप्रती प्रेम व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी हा सण साजरा केला जातो. याच भावनेतून गणेश किसन आप्पा यादव बैलगाडा संघटनेच्या वतीने बैलपोळ्याचे नियोजन करण्यात आले होते. बैलपोळ्यानिमित्त बैलांना पारंपरिक पद्धतीने सजविण्यात आले होते. बैलांच्या अंगावर रंगीबेरंगी झूल, शिंगांना आकर्षक रंग, गळ्यात घंटा आणि विविध पारंपरिक सजावटीच्या वस्तू घालण्यात आल्या होत्या. सजविलेल्या बैलांचे देखणे रूप पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी गर्दी केली होती.

नवरात्रोत्सवामुळे फुलबाजारात तेजी

■ पिंपरी (दै. संध्या)

घटस्थापनेपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात झाल्याने फुलबाजारात झेंडूच्या फुलांना मागणी वाढली आहे. बाजारात देशी पिवळा गोंडा (झेंडू) आणि केशरी कलकत्ता (गोंडा) यांची मोठी आवक झाली आहे, अशी माहिती पिंपरी-चिंचवड फुलबाजार आडते संघ राजकुमार मोरे यांनी दिली. सध्या फुलांची मागणी वाढल्याने फुल बाजारात तेजी आहे.

नवरात्रोत्सवामध्ये घराघरांमध्ये आणि मंडळांमध्ये पूजा अनेकविध धार्मिक कार्यक्रम असतात. फुलबाजारात विड्याची पाने, तुळशीची पाने, कमळाची फुले, झेंडू, शेवंती, बिजलीची फुले यांची आवक मोठ्या प्रमाणात झाली आहे.

घाऊक बाजारात पिवळा गोंडा ६० - ७०, पिवळा कलकत्ता गोंडा ७० रुपये किलो, केशरी गोंडा ४० रुपये, केशरी कलकत्ता ६० रुपये किलो, तुळजापुरी गोंडा ६० रुपये किलो दर होता. शेवंती १५० रुपये, जांभळी शेवंती १०० रुपये, कबूतर शेवंती २०० रुपये, अष्टर १०० रुपयांना ३ जुड्या, लाल गुलाब तुकडा १५० रुपये किलो, कलर गुलाब तुकडा १०० रुपये, डच गुलाब १०० ते १२० रुपये किलो. तिळाची फुल १०० - २०० वाटा, कमळ १० रुपये, निशिगंधा ६०० रुपये किलोने विक्री केली जात आहे. शहरातील बाजारपेठेत नवरात्रीमधील घटाच्या पूजेसाठी लागणाऱ्या तिळाच्या फुलांची आवक सुरू झाली आहे.

पिंपरी भाजी मंडई, कासारवाडी आणि भोसरी येथील फुल बाजारात सोलापूर, लातूर आणि सातारा जिल्ह्यातून तिळाची फुलांची आवक होते.

कल्पतरू चौकातील कोंडी फोडण्यासाठी बॅरिकेट्स

■ पिंपळे गुरव (दै. संध्या)

शहरातील अत्यंत महत्त्वाचा आणि गजबजलेला भाग असलेल्या पिंपळे गुरव येथील कल्पतरू चौकात दररोज होणाऱ्या भीषण वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी अखेर प्रशासनाकडून पावले उचलण्यात आली आहेत. या चौकात नवीन बॅरिकेट्स बसविण्यात आले असून, यामुळे वाहनांच्या हालचालींना शिस्त लागून वाहतूक सुरळीत होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. कल्पतरू चौकातून पुढे भोसरी, वल्लभनगर आणि पिंपरीच्या दिशेने मोठ्या प्रमाणात वाहतूक होते.

तसेच भोसरी ते वाकड बीआरटी रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी येथे मोठी वाहतूक कोंडी होत असते. या मार्गावर खासगी बसेस आणि इतर प्रवासी वाहनांचीही सतत ये-जा सुरू असते. त्यातच रस्ता अरुंद असल्याने सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. चौकात सिग्नल असूनही वाहतुकीचा वेग मंदावत असल्याने वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता.

या चौकातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि वाहनांच्या अनियंत्रित हालचालींना आळा घालण्यासाठी नवीन बॅरिकेट्स बसविण्यात आले आहेत. या व्यवस्थेमुळे वाहतुकीचा प्रवाह अधिक नियोजनबद्ध होण्यास मदत होऊ शकते आणि वाहनचालकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, बॅरिकेट्सची ही व्यवस्था प्रत्यक्षात किती प्रभावी ठरते, हे आगामी काही दिवसांतील वाहतुकीच्या स्थितीवरून स्पष्ट होईल. कल्पतरू चौकातून दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना या कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने प्रशासनाने यावर ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

नवीन बॅरिकेट्समुळे तात्पुरता दिलासा मिळण्याची शक्यता असली, तरी बीआरटी मार्ग आणि अरुंद रस्त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्येचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. योग्य नियोजन, वाहनांची शिस्त आणि पूरक उपाययोजनांमुळेच या चौकातील कोंडीवर दीर्घकालीन तोडगा निघू शकतो. कल्पतरू चौकातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी नवीन बॅरिकेट्स लावून लेन सिस्टीम सुरू केली.

पिंपरी-चिंचवडमध्ये नवरात्रोत्सवाचा जल्लोष; ५० हून अधिक मैदानांवर दांडिया-गरबाची धूम

■ पिंपरी: (दै. संध्या)

शारदीय नवरात्रोत्सवासाठी पिंपरी-चिंचवड शहर सज्ज झाले आहे. रविवार (दि. ११) पासून पुढील नऊ दिवस शहर भक्तीच्या रंगात आणि रात्री दांडियाच्या जल्लोषात रंगून जाणार आहे. शहरातील देवीच्या प्रमुख मंदिरांमध्ये घटस्थापनेची तयारी पूर्ण झाली आहे. आकुर्डीतील तुळजाभवानी मंदिर, पिंपरीतील वैष्णोदेवी माता मंदिर, चिंचवडमधील कालिका माता मंदिर आणि निगडीतील दुर्गा देवी मंदिरामध्ये आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली आहे. मंदिरांमध्ये रोज सकाळी अभिषेक, होमहवन आणि संध्याकाळी आरतीचे आयोजन करण्यात आले आहे. दुसरीकडे तरुणाईसाठी नवरात्र म्हणजे दांडियाचा उत्सव. शहरातील ५० हून अधिक मैदानांवर गरबा-दांडियासाठी मंडप उभारले गेले आहेत. वाकड, पिंपळे सौदागर, रहाटणी येथे मोठ्या गरबा महोत्सवांची तिकीट विक्री सुरू झाली आहे. नऊ दिवस, नऊ रंगांची थीम यंदा विशेष आकर्षण ठरणार आहे. नवरात्र म्हटले की, भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम ठरलेले आहेत. त्यामुळे कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शहर परिसरात दांडिया, रास, गरबाचे सराव अंतिम टप्प्यात आले आहेत. आता घटस्थापनेपासून दांडियाच्या तालावर नृत्य करण्यास तरुणाई तयार झाली आहे. शहरामध्ये जवळपास एक महिना गरबा आणि दांडियाच्या प्रशिक्षणाचे क्लास सुरू होते. हौसेला मौल नाही याप्रमाणे यामध्ये अगदी लहान मुलींपासून ते मध्यमवयीनदेखील व्यक्तींचादेखील सहभाग होता. आता सरावाचे दिवस संपले असून उद्यापासून दांडियाचा प्रत्यक्ष आनंद लुटण्याची उत्सुकता लागली आहे. धार्मिकता, पावित्र्य आणि व्रतवैकल्याच्या नवरात्री दांडिया-गरब्यामुळे आनंदोत्सवात न्हावून जाणार आहे. तरुणाईच्या जल्लोषाचं वैशिष्ट्य इव्हेण्ट्स, स्पॉन्सर्स, भरघोस बक्षिसे अशा कितीतरी गोष्टी. अवघ्या तरुणाईला साद घालणारा हा उत्सव आता भरात आलाय. त्यात कॉलेज गोईंग मुलामुलींची शनिवार व रविवारसाठी चाललेली जय्यत तयारी तर विचारायलाच नको.



‘आई-बाप समजून घेताना’ व्याख्यानाने आळेकरांच्या डोळ्यांत आणले अश्रू

वसंत हंकारे यांच्या मार्गदर्शनाने ३ हजार विद्यार्थी व पालक झाले भावूक

■ नारायणगाव : (दै. संध्या)

आई-वडील आपल्या मुलांसाठी आयुष्यभर कष्ट करतात, स्वतःच्या इच्छा-आकांक्षांना मुरड घालतात, स्वतःच्या सुखाचा त्याग करून मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी झटत असतात. मात्र, अनेकदा त्यांच्या त्यागाची आणि प्रेमाची खरी जाणीव मुलांना होत नाही. आई-वडिलांचे हेच अनमोल स्थान, त्यांचे निस्वार्थ प्रेम, त्याग, कष्ट आणि संस्कार यांची जाणीव करून देणारे समाजप्रबोधनकार व युवा मार्गदर्शक वसंत हंकारे सर यांचे ‘आई-बाप समजून घेताना’ हे प्रेरणादायी व्याख्यान आळे येथे पार पडले. या व्याख्यानाने उपस्थित सुमारे तीन हजार विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि पालक अक्षरशः भावूक झाले. अनेक विद्यार्थी आणि पालकांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव करून देत पालक आणि पाल्य यांच्यातील नात्याची वीण अधिक घट्ट करणारा हा कार्यक्रम आळे पंचक्रोशीत चर्चेचा विषय ठरला.



ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ, आळे-संतवाडी-कोळवाडी यांच्या वतीने ज्ञानमंदिर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, आळे तसेच मा. बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे यांच्या संयुक्त सहभागातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानाला सुमारे तीन हजार विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यामध्ये विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पंचक्रोशीतील नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. कार्यक्रमाला लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि व्याख्यानादरम्यान निर्माण झालेले भावनिक वातावरण यामुळे हा उपक्रम सर्वांच्या कायम स्मरणात राहील, असा ठरला.

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत विद्यार्थी मोबाईल, सोशल मीडिया, विविध आकर्षणे, शैक्षणिक स्पर्धा आणि मानसिक ताणतणाव अशा अनेक आव्हानांना सामोरे जात आहेत. या परिस्थितीत मुलांनी आपल्या आई-वडिलांचे महत्त्व समजून घेणे, त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवणे, त्यांच्या भावनांचा आदर करणे आणि त्यांच्याशी प्रेमाने वागणे अत्यंत आवश्यक आहे. वसंत हंकारे सरांनी आपल्या ओघवत्या वक्तृत्वातून आणि हृदयाला भिडणाऱ्या विचारांतून हाच संदेश विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवला. आई-वडील मुलांच्या सुखासाठी स्वतःच्या सुखाचा त्याग कसा करतात, मुलांच्या शिक्षणासाठी आणि भवितव्यासाठी किती संघर्ष करतात, आपल्या मुलांनी आयुष्यात यशस्वी व्हावे म्हणून किती कष्ट सोसतात, याचे वास्तववादी चित्र त्यांनी आपल्या व्याख्यानातून उभे केले.

आई-वडिलांचे प्रेम हे जगातील सर्वांत निस्वार्थ प्रेम असून त्यांच्या कष्टांची परतफेड कोणत्याही संपत्तीने करता येत नाही. मुलांनी मोठे झाल्यानंतर आपल्या पालकांना विसरू नये, त्यांच्या भावनांचा विचार करावा, त्यांच्याशी संवाद साधावा आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी प्रयत्न करावेत, असा भावनिक संदेश हंकारे सरांनी दिला. त्यांच्या प्रत्येक विचारातून पालकांच्या त्यागाची जाणीव होत होती. व्याख्यानातील अनेक प्रसंगांनी उपस्थितांच्या मनाला खोलवर स्पर्श केला. अनेक विद्यार्थ्यांना आपल्या आई-वडिलांनी आजवर घेतलेल्या कष्टांची जाणीव झाली, तर पालकांनाही मुलांच्या भावविश्वाशी जोडले गेल्याचा अनुभव आला. सभागृहात भावनिक वातावरण निर्माण झाले. अनेक विद्यार्थी आपल्या भावना आवरू शकले नाहीत. काही पालकही अक्षरशः रडू लागले. आई-वडिलांच्या प्रेमाची आणि त्यागाची जाणीव करून देणाऱ्या या व्याख्यानाने अनेकांच्या मनातील भावनांना वाट मोकळी करून दिली.या कार्यक्रमाचे सर्वांत मोठे यश म्हणजे विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महत्त्व केवळ शब्दांतून समजले नाही, तर ते त्यांच्या मनापर्यंत पोहोचले. आई-बापाच्या कष्टांची जाणीव, त्यांच्या प्रेमाची किंमत आणि त्यांच्याप्रती असलेली कृतज्ञता या भावना विद्यार्थ्यांच्या मनात जागृत झाल्या. शिक्षण घेताना केवळ पुस्तकी ज्ञान, परीक्षेतील गुण आणि करिअर यांनाच महत्त्व नसून चांगला माणूस घडणे, नात्यांचा आदर करणे, संस्कार जपणे आणि आपल्या कुटुंबाप्रती जबाबदारी ओळखणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे, हा विचार या व्याख्यानातून प्रभावीपणे मांडण्यात आला. पालक आणि विद्यार्थी यांना भावनिक पातळीवर जोडणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने जीवनशिक्षण देणारा ठरला.वसंत हंकारे सरांचे आळे येथे आगमन झाल्यानंतर ज्ञानमंदिर हायस्कूलच्या वतीने लेझीम पथक आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलनातून त्यांचे स्वागत केले. लेझीम पथकाचा उत्साह, एनसीसीच्या विद्यार्थ्यांची शिस्त आणि स्वागतासाठी करण्यात आलेली विशेष व्यवस्था यामुळे कार्यक्रमाला आगळेवेगळे स्वरूप प्राप्त झाले. विद्यार्थ्यांमधील शिस्त, संघभावना आणि सांस्कृतिक परंपरांचे दर्शन या वेळी घडले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर कुऱ्हाडे यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करत विद्यार्थ्यांना आई-वडिलांच्या त्यागाची जाणीव करून देणाऱ्या अशा उपक्रमांची आजच्या काळात असलेली गरज अधोरेखित केली. सौ. अश्विनी सम्राट कुऱ्हाडे यांनी मनोगत व्यक्त करत कार्यक्रमाच्या सामाजिक आणि भावनिक महत्त्वावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांच्या जीवनात पालकांचे स्थान अनन्यसाधारण असून त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवणे, त्यांचा आदर करणे आणि त्यांच्याप्रती कृतज्ञ राहणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, हा विचार या कार्यक्रमातून प्रकर्षाने समोर आला. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे अध्यक्ष श्री. अजय नाना कुऱ्हाडे यांनी आभार व्यक्त केले. वसंत हंकारे सरांनी आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून आळे येथे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना आणि समाजबांधवांना अनमोल मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांनी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रसन्ना डोके, भाऊ कुऱ्हाडे, अश्विनी कुऱ्हाडे, गणेश शिंदे भावकी, सुधीर कोकणे, रमेश डावखर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष आर्थिक सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे या भव्य उपक्रमाला आवश्यक पाठबळ मिळाले. ज्ञानमंदिर हायस्कूलचे प्राचार्य संदीप भवारी, मा. बाळासाहेब जाधव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव, तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी आणि यशस्वितेसाठी विशेष मेहनत घेतली. विद्यार्थ्यांची उपस्थिती, स्वागत व्यवस्था, शिस्त, कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी अशा विविध बाबींमध्ये सर्वांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. आळे आणि पंचक्रोशीतील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात प्रथमच अशा स्वरूपाचा भव्य आणि भावनिकदृष्ट्या परिणामकारक उपक्रम आयोजित करण्यात आल्याने या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता त्यांच्यामध्ये जीवनमूल्ये, कौटुंबिक संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि पालकांविषयी आदराची भावना निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. आजच्या धावपळीच्या जीवनात अनेकदा कुटुंबातील संवाद कमी होत असताना, मुलांनी आई-वडिलांच्या भावनांचा विचार करावा आणि पालकांनीही मुलांशी प्रेमाने संवाद साधावा, असा सकारात्मक संदेश या व्याख्यानातून समाजापर्यंत पोहोचला.

एखाद्या कार्यक्रमाचे यश केवळ उपस्थितांच्या संख्येवर किंवा कार्यक्रमाच्या भव्यतेवर अवलंबून नसते, तर त्या कार्यक्रमातून किती जणांच्या मनात सकारात्मक बदल घडतो, यावर त्याचे खरे यश ठरते. वसंत हंकारे सरांच्या ‘आई-बाप समजून घेताना’ या व्याख्यानाने आळे येथे याच परिवर्तनाची अनुभूती दिली. व्याख्यान ऐकताना विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत आलेले अश्रू, पालकांच्या मनातील भावना आणि आई-वडिलांच्या मोलाची नव्याने झालेली जाणीव हेच या कार्यक्रमाचे सर्वांत मोठे फलित ठरले.

आई-वडिलांचे प्रेम समजून घेणे, त्यांच्या कष्टांचा आदर करणे, त्यांच्या त्यागाची जाणीव ठेवणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न करणे, हा संदेश घेऊन विद्यार्थी या कार्यक्रमातून बाहेर पडले. ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाने आयोजित केलेल्या या उपक्रमामुळे आळे पंचक्रोशीत सामाजिक प्रबोधनाची नवी दिशा निर्माण झाली. ‘आई-बाप समजून घेताना’ या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना आई-वडिलांची किंमत कळली, त्यांच्या त्यागाची जाणीव झाली आणि पालकांविषयी कृतज्ञतेची भावना जागृत झाली, हेच या कार्यक्रमाचे खरे यश ठरले.

संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव डॉ. अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे तसेच संचालक किशोर कुऱ्हाडे, भाऊ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबू कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रदीप गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे तसेच सर्व संचालक मंडळाने या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले.

थोडक्यात पण महत्वाचे

चाकण पंचक्रोशीत शारदीय नवरात्रोत्सवास प्रारंभ

चाकण : दैनिक संध्या

शारदीय नवरात्रोत्सवास चाकण पंचक्रोशीत प्रारंभ झाला असून, चाकण शहरासह परिसरात दांडिया आणि गरब्याच्या आयोजनाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवात सहभागी होण्यासाठी तरुणाईमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक मंडळे, हाउसिंग सोसायट्या आणि नृत्य प्रशिक्षण केंद्रांच्या वतीने दांडिया व गरबा महोत्सवांचे नियोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तरुण व तरुणींकडून गरब्याच्या विविध नृत्य प्रकारांचा सराव केला जात आहे. आकर्षक चनिया चोली, कुर्ते, पारंपरिक दागिने आणि दांडिया खरेदीसाठी चाकण बाजारपेठेत तरुणाईची लगबग सुरू झाली आहे. पारंपरिक वेशभूषा, संगीताचे ठेके आणि रंगीबेरंगी रोषणाई यामुळे नवरात्रोत्सवात उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे. दांडिया आणि गरबा महोत्सव शांततेत व सुरक्षित वातावरणात पार पडावा, यासाठी आयोजकांकडून नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमस्थळी आवश्यक प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे आणि सुरक्षेच्या उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे. उत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पारंपरिक संस्कृतीचे जतन, संगीताची रंगत आणि सामूहिक उत्सवाचा आनंद यांचा संगम असलेल्या नवरात्रोत्सवाची चाकणकरांना उत्सुकता लागली आहे. दांडिया आणि गरब्याच्या तालावर नऊ रात्री जल्लोष करण्यासाठी शहरातील तरुणाई सज्ज होत असून, चाकणमध्ये नवरात्रोत्सवाची उत्साहपूर्ण चाहूल लागली आहे.

चाकण परिसरात बैलपोळा सण उत्साहात साजरा, पारंपरिक संस्कृतीचे दर्शन

चाकण : दैनिक संध्या



शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करणारा पारंपरिक बैलपोळा सण चाकण शहरासह परिसरातील ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यंदा बैलपोळा आणि पितृ अमावस्या एकाच दिवशी आल्याने परिसरात धार्मिक विधींसह पारंपरिक संस्कृतीचे चांगलेच दर्शन घडले. बैलपोळ्यानिमित्त शेतकऱ्यांनी सकाळपासूनच आपल्या बैलांना अंघोळ घालून त्यांची आकर्षक सजावट केली होती. बैलांच्या शिंगांना रंग देऊन, अंगावर नक्षीदार झूल, बाशिंग आणि गळ्यात घुंगरांच्या माळा घातल्या होत्या. सजवलेल्या बैलांमुळे गावोगावी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शेतात वर्षभर कष्ट करणाऱ्या बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकऱ्यांनी बैलांची विधिवत पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला. काही ठिकाणी पारंपरिक वाद्यांच्या गजरात बैलांची मिरवणूक काढण्यात आली. या सणात शेतकरी, महिला आणि लहान मुलांनी उत्साहाने सहभाग घेतला. पितृ अमावस्येनिमित्त पूर्वजांचे स्मरण करून धार्मिक विधी करण्यात आले. त्यानंतर बैलपोळ्याचा सण साजरा करण्यात आला. शेती आणि ग्रामीण जीवनाशी अतूट नाते असलेल्या या सणातून शेतकऱ्यांची पशुधनांप्रती असलेली आपुलकी, कृतज्ञता आणि महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेचे दर्शन घडले. चाकण परिसरातील बाजारपेठा आणि ग्रामीण भागात सणानिमित्त आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. पारंपरिक पद्धतीने साजरा झालेल्या बैलपोळ्यामुळे ग्रामीण संस्कृतीचा वारसा पुन्हा एकदा अधोरेखित झाला. "ग्रामीण भागात आजही बैलपोळा सण मोठ्या दिमाखात साजरा केला जातो. शेती प्रधान देशात बैलांना मोठा मान आहे.

विद्यापीठस्तरीय जल्लोषमध्ये टी.सी.ला विजेतेपद

■ बारामती (दै. संध्या)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ व संगमनेर महापालिका व दा. ज. मालपाणी वाणिज्य आणि ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठ स्तरीय ‘जल्लोष-२०२६’ युवा महोत्सवात अनेक कला प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने प्रथमच विजेतेपद पटकावत ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. याआधी ही स्पर्धा सहा ठिकाणी विभागस्तरीय आयोजित केली होती. यामध्ये महाविद्यालयाने तब्बल २८ पैकी २४ कलाप्रकारांमध्ये विजेतेपद मिळवत १६६ गुणांची ऐतिहासिक विक्रमी कामगिरी केल्याने विद्यापीठ स्तरावर टी.सी. महाविद्यालयाची निवड झाली.



महोत्सवात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य व ललित कला या पाचही प्रमुख विभागांत दमदार कामगिरी करत आपल्या कलागुणांची छाप उमटवली. विविध कलाप्रकारांतील सातत्यपूर्ण यशामुळे महाविद्यालयाने विद्यापीठ स्तरीय ‘जल्लोष’च्या विजेतेपदावर आपले नाव कोरले. ही एक ऐतिहासिक नोंद झाली आहे. कारण प्रथमच ग्रामीण भागात हे विजेतेपद प्राप्त झाले आहे. यासाठी या स्पर्धेचा विशेष उल्लेख करावा लागेल. पारितोषिक वितरण समारंभास प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर विद्यार्थी विकास मंडळाच्या संचालक डॉ. सविता कुलकर्णी, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. संदिप पालवे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. भीमराव तोरणे, प्रा. सोमनाथ कदम आणि प्रा. राजेंद्र कंडरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत या स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले. या अभूतपूर्व यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, सर्व उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. भीमराव तोरणे, प्रा. सोमनाथ कदम, प्रा. राजेंद्र कंडरे आणि सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

बनावट आधारकार्डद्वारे १० एकर जमीन हडपण्याचा प्रयत्न

■ नारायणगाव(दै. संध्या)

दुसऱ्याच्या मालकीची आणि अनेक वर्षांपासून कायदेशीर ताब्यात असलेली कोट्यवधी रुपयांची १० एकर शेतजमीन हडप करण्यासाठी बनावट आधारकार्डचा वापर करून फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. केवळ खरेदीखतच नव्हे, तर याच बनावट कागदपत्रांच्या आधारे पतसंस्थेकडून तब्बल दीड कोटी रुपयांचे गहाणखत करून कर्ज उचलण्यात आले आहे. याप्रकरणी जुन्नर न्यायालयाच्या आदेशानुसार नारायणगाव पोलिसांनी नऊ जणांविरुद्ध फसवणूक आणि बनावट दस्तऐवज तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत शिरोली तर्फे आळे (ता. जुन्नर) येथील रहिवासी संतोष लक्ष्मण चिंचवडे (वय ४२) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, शिरोली तर्फे आळे येथील गट क्रमांक २२७ मधील शेतजमीन कृष्णाबाई भ्रतार विनायक यांच्या नावावर असून, १९७५ पासून चिंचवडे कुटुंबाच्या ताबेवहिवाटीत आहे. ा जमिनीच्या मालकी हक्काबाबत जुन्नर येथील दिवाणी न्यायालयात दावा प्रलंबित असून, यापूर्वी वृत्तपत्रात जाहीर नोटीसही प्रसिद्ध करण्यात आली होती. असे असतानाही कांदळी येथील संतोष शिवाजीराव बढे आणि त्याच्या साथीदारांनी संगनमताने जमीन हडपण्याचा कट रचला. त्यांनी मूळ मालकीण कृष्णाबाई यांच्या जागी सुलोचना भास्कर खरे या महिलेला उभे करून तिच्या नावाने बनावट आधारकार्ड तयार करण्यात आले. त्यानंतर तीच मूळ मालकीण असल्याचे भासवून या कागदपत्रांच्या आधारे ४ जून २०२४ रोजी नारायणगाव येथील दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदीखताची नोंदणी करण्यात आली. या दस्ताची नोंदणी क्रमांक ३११०/२०२४ असा आहे. खरेदीखताची नोंदणी केल्यानंतर संतोष बढे आणि त्याचा मुलगा सौरभ बढे यांनी चिंचोडी येथील भैरवनाथ नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखेत या जमिनीवर १ कोटी ५० लाख रुपयांचे गहाणखत करून घेतल्याचा आरोप आहे.

शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सहभागातून अनाथ मुले व वृद्धाश्रमात धान्य वाटप

■ चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्याचे आमदार व शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व.सुरेशभाऊ गोरे यांच्या स्मृती दिनानिमित्त स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मीडियम स्कूल व स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज मधील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सहभागातून जमा करण्यात आलेले हजार किलो गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी आदी कडधान्य अनाथ आश्रमातील मुलांसाठी व वृद्धाश्रमात मदत म्हणून देण्यात आले.

प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांनी स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. विकास गोरे यांनी यावेळी सुरेशभाऊ यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे सांगितले. कष्टकरी, वारकरी, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात केलेले व समाजाभिमुख होत असलेले कार्य आणि त्यांचा आपल्या शैक्षणिक संस्थेच्या स्थापना करण्याचा संकल्प केला. या माध्यमातून संस्कारक्षम शिक्षण देऊन देशाचे सुसंस्कृत, सुशिक्षित नागरिक घडविण्याचे काम शाळेच्या माध्यमातून घडणार असा विश्वास त्यांनी निर्माण केला. प्रशालेतील शिक्षक व विद्यार्थी यांच्या सहभागातून मूठभर धान्य, जीवनोपयोगी साहित्य जमा करण्यात आले. एक हजार किलो गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, कडधान्य गोळा करून अनाथ आश्रम व वृद्धाश्रमासाठी मदत म्हणून जमा करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, वंदना बकाल, सिद्धार्थ मळेवाडी, नितीन शिंदे, मनीषा दातीर, वीर बोऱ्हाडे, स्वरा रेपाळे, दत्तात्रय लिंभोरे, सुनिल वडेकर आदींनी सुरेशभाऊ गोरे यांना अभिवादन केले.



थोडक्यात पण महत्वाचे



जुन्नर तालुक्यात दुष्काळ जाहीर करा आणि वीज कपात थांबवा

नारायणगाव : दैनिक संध्या

जुन्नर तालुक्यात यंदा एल निनो मुळे निर्माण झालेली तीव्र दुष्काळी परिस्थिती आणि महावितरण कंपनीकडून केली जाणारी शेतकरी पंपांची थ्री-फेज वीज कपात याविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आक्रमक पाऊल उचलले आहे. संघटनेच्या वतीने जुन्नर येथील उपकार्यकारी अभियंता यांना एक लेखी निवेदन सादर करून शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली आहे. जुन्नर तालुक्यात पावसाने दडी मारल्यामुळे भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. बहुतांश भागांतील विहिरी आणि कूपनलिका (बोअरवेल) कोरड्या पडल्या असून, पिकांना पाणी देणे अशक्य झाले आहे. यामुळे भाजीपाला, सोयाबीन, आणि फळबागा जळून खाक झाल्या आहेत. तालुक्यातील मुख्य पीक असलेल्या उसाचे वजनही घटले आहे. प्रशासनाने अद्याप जुन्नर तालुक्याला दुष्काळी भागातून वगळल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. त्यामुळे तहसीलदार आणि कृषी विभागामार्फत तातडीने पंचनामे करून जुन्नर तालुका दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सध्या महावितरण कंपनीकडून शेतकऱ्यांना केवळ ४ तास थ्री-फेज वीज दिली जात आहे, आणि त्यामध्येही अचानक सेट डाऊन देखील घेतला जात आहे. विजेअभावी पिकांना पाणी देता येत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच, सिंगल फेज वीज वापरणाऱ्या शेतकऱ्यांवर महावितरणकडून दंडात्मक कारवाई केली जात आहे. या अन्यायाविरुद्ध स्वाभिमानी शेतकरी संघटनेने इशारा दिला आहे की, जर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी जुन्नर तालुक्यातील कोणत्याही गावात वीज कनेक्शन कापण्याचा प्रयत्न केला, तर संघटना आणि स्थानिक शेतकरी त्याला 'जशास तसे' उत्तर देतील आणि वीज कनेक्शन कापू देणार नाहीत. शेतकऱ्यांवर होणारी अन्यायाची वीज कपात आणि छापेमारी त्वरित बंद न झाल्यास, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष श्री. प्रभाकरजी बांगर यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालय आणि तहसीलदार कार्यालयासमोर उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

आधुनिक शेती तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी विकास चव्हाण यांचा सन्मान

नारायणगाव: दैनिक संध्या

ऊस शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्यासाठी तसेच शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार करण्यासाठी केलेल्या कार्याची दखल घेत स्मार्ट व्हिलेज पारगाव चे श्री विघ्नहर्ता सहकारी साखर कारखान्याचे तज्ञ संचालक विकास हरिभाऊ चव्हाण यांचा जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी आमदार शरद सोनवणे यांच्या हस्ते चव्हाण यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बाजार समितीचे सभापती ॲड. संजय शिवाजी काळे यांनी भूषवले. सन्मानमूर्ती चव्हाण हे ऊस शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकऱ्यांसाठी कमी खर्चातील उत्पादन पद्धतींचा प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांनी ऊस पाचट व्यवस्थापन, सुपर केन नर्सरी तंत्रज्ञान आणि उत्पादन खर्चात बचत करून शाश्वत ऊस शेती कशी करावी, याबद्दल उपस्थित शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली व त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.त्यांच्या या कार्यामुळे आधुनिक शेती पद्धतींचा प्रसार होण्यास मदत होत आहे. या कार्यक्रमाला माजी आमदार अतुल बेनके, कृषिरत्न अनिल तात्या मेहेर,बाजार समितीचे उपसभापती एन. एम. काळे, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक घोलप,माजी उपसभापती प्रकाश ताजणे, पंचायत समिती सदस्य संभाजी चव्हाण, बळीराम चव्हाण तसेच जुन्नर-आंबेगाव ऊस उत्पादक संघाचे सदस्य उपस्थित होते.

रीलसाठी रस्त्यावर धोकादायक स्टंट; रिलस्टार महाराजांसह आठ जणांवर गुन्हा

आळंदी : दैनिक संध्या

नवीन चारचाकी वाहनाच्या स्वागताचा रील बनविण्यासाठी सार्वजनिक रस्त्यावर धोकादायक स्टंट करणे आळंदीतील महाराजांसह आठ जणांना महागात पडले आहे. खेड तालुक्यातील केळगाव हद्दीत बेदरकारपणे वाहन चालवून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी आळंदी पोलिसांनी आठ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या स्टंटसाठी वापरण्यात आलेली नवीन चारचाकीही पोलिसांनी जप्त केली आहे. रिल स्टार महाराज महेश बाळकृष्ण मडके (रा. गोपालपुरा, आळंदी) यांनी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी नवीन चारचाकी खरेदी केली होती. या वाहनाच्या स्वागताचा रील तयार करण्यासाठी संबंधितांनी केळगाव येथील सार्वजनिक रस्त्यावर वाहने बेदरकारपणे चालविली. कार गोलाकार फिरवून धोकादायक स्टंट करण्यात आले. त्यामुळे रस्त्यावरील नागरिकांच्या तसेच वाहनातील व्यक्तींच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला. विशेष म्हणजे, या स्टंटचे चित्रीकरण करण्यासाठी प्रशासनाची पूर्वपरवानगी न घेता ड्रोनचा वापर करण्यात आल्याचे समोर आले आहे. पिंपरी-चिंचवडचे सहपोलीस आयुक्त यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणीही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात महेश बाळकृष्ण मडके, प्रतिक शिंदे (रीलस्टार, रा. बारामती), विशाल सातारे, यश मुंगसे यांच्यासह अन्य चार जणांचा समावेश आहे. याप्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास आळंदी पोलीस करीत आहेत.

अग्रसेन महाराज जयंती महोत्सवाचे उद्घाटन

चिंचवड : दैनिक संध्या

महाराजा अग्रसेन जयंतीनिमित्त महाराजा अग्रसेन ट्रस्ट चिंचवड प्राधिकरणच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अग्रसेन जयंती महोत्सवाचे उद्घाटन वाल्हेकरवाडी येथे करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपमहापौर शैलेजा मोरे, नगरसेवक अमित गावडे, प्रख्यात हृदय रोगतज्ञ डॉ शिव गुप्ता उपस्थित होते. तसेच अग्रसेन ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रेमचंद मित्तल,विनोद बन्सल,मोहन गर्ग, वेद प्रकाश आगरवाल, रामअवतार आगरवाल, अशोक आग्रवाल, निरंजन आगरवाल,अध्यक्ष धर्मेंद्र आग्रवाल, सचिव सुनील जयकुमार आग्रवाल,खजिनदार विनोद मित्तल, कार्याध्यक्ष विकास गर्ग आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी हरियाणवी गायिका रॉनी रामन यांनी देशभक्तीपर गीत सादर करून रसिकांच्या टाळ्यांची दाद मिळवली. तसेच संदीप पंचवटकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केलेल्या गरबा गीतावर आग्रवाल बांधवांनी दांडिया चा आनंद लुटला. यावेळी डॉ गुप्ता म्हणाले कि, हृदयरोगाचा झटका कमी वयातील तरुणांना येत आहे. कारण त्यांची बदलती जीवनशैली.महिलांनी स्वयंपाक गृहात शकतो पौष्टिक अन्नपदार्थ बनवा. गोड पदार्थ खाणे टाळा. जेणे करून आजारी पडणार नाही. सर्व श्रीमंताच्या यादीत गुप्ता,आग्रवाल समाजाची नावे आढळून आली,मात्र बीपी शुगरने त्रस्त असलेले सर्वाधिक जास्त रुग्णांची संख्या पण आपल्या समाजात असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले. हे जास्त गोड आणि भिकेपेक्षा जास्त खाणे टाळा. असा सल्ला डॉ गुप्ता यांनी दिला.

ग्लोबल वॉर्मिंगचा धोका वाढतोय; निसर्ग संवर्धनासाठी जनजागृतीही महत्त्वाची

नीरा येथे वसुंधरा दिंडीच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर माऊली पालखी तळावर वृक्षारोपण; निसर्ग संवर्धनाचा दिला संदेश

■ नीरा(दै. संध्या)



जागतिक तापमानवाढीचा धोका दिवसेंदिवस वाढत असून, त्याचे परिणाम दुष्काळ, पावसाच्या अनियमिततेसह विविध स्वरूपांत जाणवू लागले आहेत. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन करणे आणि त्याबाबत समाजात जनजागृती निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर लावलेल्या झाडांचे संगोपनही केले पाहिजे. यातूनच भविष्यातील पिढ्यांना समृद्ध आणि संतुलित निसर्ग देता येईल, असे प्रतिपादन पुरंदर पंचायत समितीचे उपसभापती प्रवीण जगताप यांनी केले.

पुरंदर तालुक्यातील नीरा येथे वसुंधरा पायी दिंडीच्या आगमनानिमित्त संत ज्ञानेश्वर माऊली पालखी तळावर वृक्षारोपण करण्यात आले. उपसभापती जगताप यांच्या हस्ते हा उपक्रम पार पडला. यावेळी त्यांनी वृक्षांचे पर्यावरणातील महत्त्व अधोरेखित करत निसर्ग संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

धार्मिक सण, उत्सव तसेच विविध जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. झाडे लावणे आणि त्यांचे योग्य संगोपन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मानवाकडून आजवर निसर्गाची मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. ही हानी भरून काढण्यासाठी वृक्षसंवर्धनासारखे उपक्रम व्यापक स्वरूपात राबविणे गरजेचे आहे. अशा प्रयत्नांतून निसर्ग अधिक समृद्ध होईल आणि पुढील पिढ्यांना चांगले पर्यावरण मिळण्यास मदत होईल, असेही जगताप यांनी सांगितले. दरम्यान, शनिवारी सकाळी पुण्याहून नाणीजधामच्या दिशेने निघालेली वसुंधरा पायी दिंडी निरा येथील संत ज्ञानेश्वर माऊली पालखी तळावर विसावली. यावेळी गुरूंची महाआरती आणि महापूजा करण्यात आली. त्यानंतर दिंडीतील भाविकांनी सकाळची न्याहारी करून सातारा जिल्ह्यातील वाठार स्टेशन येथील मुक्कामासाठी पुढील प्रवास सुरू केला. नीरा येथील ग्रामस्थांनी या दिंडी सोहळ्याचे उत्साहात स्वागत केले. यावेळी शिवसेनेचे गटप्रमुख प्रकाश शिंदे, संप्रदायातील अनेक भाविक-भक्त, निराचे प्रभारी पोलीस पाटील राहुल शिंदे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

राज्याच्या विविध भागांतून नाणीजधामच्या दिशेने निघालेल्या दिंड्यांच्या माध्यमातून भक्तीबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जात आहे.

वृक्षारोपण, वृक्षांचे संगोपन आणि पर्यावरणाविषयी जनजागृती या माध्यमांतून निसर्ग रक्षणाचा विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे.

डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला संपन्न

■ पुणे : (दै. संध्या)

चांदोरी येथील के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे 'बहि:शाल शिक्षण मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला नुकतीच संपन्न झाली.

सदर व्याख्यानमालेचे उद्घाटन प्रमुख अतिथी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध युवा शाहीर स्वप्नील डुंबरे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी त्यांनी 'महाराष्ट्राचा इतिहास - शाहिरी नजरेतून' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी शिवरायांच्या पराक्रमाची यशोगाथा पोवाड्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविली. तसेच अंधश्रद्धा, शेतकरी आत्महत्या यासारख्या सामाजिक विषयासंबंधी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली.

व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प प्रमुख वक्ते नाशिक येथील के.के.वाघ वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी,व्ही.रसाळ यांच्या व्याख्यानाने गुंफण्यात आले. त्यांनी ' मूल्यशिक्षण' या विषयावर मार्गदर्शन करतांना मूल्यशिक्षण हे विद्यार्थ्यांच्या चारित्र्य निर्मितीसाठी, नैतिक जाणिवा वाढवण्यासाठी आणि त्यांना जबाबदार नागरिक बनवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. पूर्वीच्या काळी बालगीतातून लोकगीतातून मूल्याचे धडे दिले जात असे.त्यातून व्यावहारिक जीवनाचे ज्ञान मिळत, असेही ते म्हणाले. इतिहासातील अनेक दाखले देवून जबाबदारीची जाणीव, अहिंसा, स्वच्छता, संवाद, प्रेम या मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रुजविले. तिसरे व्याख्यान सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोक पाटील यांच्या 'आरोग्यासाठी योग' या विषयावर झाले. मार्गदर्शनाप्रसंगी त्यांनी प्राणायाम, ध्यानधारणा, योगासने यामागील वैज्ञानिक कारणे सांगून मानसिक व शारीरिक स्वास्थ्यासाठी योग महत्त्वाचे असल्याचे सांगितले. व्याख्यानमाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव देवरे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बहि:शाल शिक्षण मंडळ समन्वयक प्रा. मनीषा चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.तेजस्विनी वालझाडे यांनी केले तर डॉ.सविता भंडारे यांनी आभार मानले.

चाकण बाजारात भुईमूग शेंगा व रताळ्याची प्रचंड आवक

■ चाकण : (दै. संध्या)



नवरात्र उत्सवामुळे खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये रताळ्याची प्रचंड आवक झाली. पालेभाज्या व फळभाज्यांचे भाव गडगडले आहेत. एकूण उलाढाल ४ कोटी ८० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ७५० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,५०० ते ४,३०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,७५० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत बटाट्याची आवक स्थिर राहिली. बटाट्याला कमाल भाव ९०० ते १,५०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १८ हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक २८० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयां पासून ते ५ हजार ५०० रुपयांपर्यंत कमाल भाव मिळाला. शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे कांदा - एकूण आवक - ७५० क्विंटल. भाव क्रमांक - १. ४,३०० रुपये, भाव क्रमांक २. ३,६०० रुपये, भाव क्रमांक ३. १,५०० रू. बटाटा - एकूण आवक - १,७५० क्विंटल.भाव क्रमांक १. १,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,१०० रुपये, भाव क्रमांक ३.९०० रुपये. फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ४९१ क्विंटल (१,००० ते २,००० रू.), कोबी - २१० क्विंटल (५०० ते १,००० रू.), फ्लॉवर - २८० क्विंटल (७०० ते १,५०० रु.), वांगी - ८४ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), भेंडी - ९८ क्विंटल (२,५०० ते ४,५०० रु.), दोडका - ६५ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), कारली - ९१ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ४० क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), काकडी - ९५ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), फरशी - ५२ क्विंटल (२,५०० ते ४,००० रु.), वालवड - ४४ क्विंटल (५,००० ते ६,५०० रुपये), ढोबळी मिरची - १२६ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), चवळी - ५६ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), शेवगा - १८ क्विंटल (४,००० ते ६,००० रु.), गाजर - २१० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - ६२ क्विंटल (३,००० ते ७,००० रु.), आले - १९० क्विंटल (५,००० ते १२,००० रु.), वाटाणा - ३० क्विंटल (८,००० ते १२,००० रु.), भुईमूग शेंगा - १५५ क्विंटल (४,५०० ते ५,५०० रु.), रताळे - १६० क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये).

नगरसेविका वर्षाताई शेवकरी यांनी केली वाहतूक कोंडी सोडविण्याची मागणी

■ चाकण (दै. संध्या)



ढिसाळ नियोजनामुळे चाकण शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. शनिवारचा साप्ताहिक बाजार आणि बैलपोळा सण हे एकाच दिवशी आल्याने चाकण शहरातील वाहतूक व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला. त्यामुळे नागरिकांचे अतोनात हाल झाले. चाकण शहरातील वाहतूक कोंडी कायमस्वरूपी सोडविण्याची मागणी चाकण नगरपरिषदेच्या नगरसेविका ॲड. वर्षाताई सुयोगदादा शेवकरी यांनी केली आहे.

जनता शिक्षण संस्थेच्या येथील श्री शिवाजी विद्यामंदिर शाळेजवळ तसेच प्रमुख मार्गांवर वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्याने नागरिकांना मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. महिलांना व लहान मुलांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. चाकणमध्ये दर शनिवारी भरणाऱ्या साप्ताहिक बाजारासाठी पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच परिसरातील ग्रामीण भागातून नागरिक मोठ्या संख्येने येथे येत असतात. त्यातच बैलपोळा सणानिमित्त खरेदीसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांची भर पडल्याने शहरातील रस्त्यांवर वाहनांची गर्दी वाढली. परिणामी, प्रमुख चौक आणि शाळा परिसरात वाहतुकीची कोंडी निर्माण झाली.वाहनांच्या लांबच लांब लागलेल्या रांगांमुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना पुढे जाणे कठीण झाले. या कोंडीचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह नोकरदार वर्गालाही बसला. शहरातील वाढती वाहतूक आणि अपुऱ्या नियोजनामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. सण उत्सव आणि साप्ताहिक बाजाराच्या दिवशी प्रशासनाकडून वाहतुकीचे योग्य नियोजन नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. चाकण मधील प्रमुख चौकांमध्ये अतिरिक्त वाहतूक पोलिसांची नियुक्ती नसल्याने मोठी कोंडी होत आहे.

शक्तिपीठ महामार्गाविरोधात आंदोलन भडकणार!

■ पुणे : (दै. संध्या)

शक्तिपीठ महामार्गासाठी पंढरपूर तालुक्यातील आव्हे तसेच माढा तालुक्यातील बावी व सोलंकरवाडी परिसरात पोलिसांच्या बंदोबस्तात शेतकऱ्यांच्या जमिनींची जबरदस्तीने मोजणी केल्याच्या निषेधार्थ ९ ऑक्टोबर रोजी राज्यभर आंदोलने करण्याचा निर्णय शक्तिपीठविरोधी महामार्ग संघर्ष समितीच्या ऑनलाइन बैठकीत घेण्यात आला. बैठकीत १३ जिल्ह्यांतील शेतकरी सहभागी झाले होते.

बैठकीत राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार सतेज पाटील आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी सरकारच्या भूमिकेवर टीका केली. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी जमिनी घेण्यासाठी बळाचा वापर केला जात असल्याचा आरोप जयंत पाटील यांनी केला. महामार्गासाठी प्रस्तावित निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी वापरण्याची मागणी सतेज पाटील यांनी केली. पोलिसांच्या बळावर सुरू असलेल्या मोजणीला विरोध करण्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला. आव्हे येथील शेतकरी जगदीश शेंबडे यांनी बैठकीत मोजणीदरम्यान आलेल्या अनुभवाची माहिती दिली. पोलिसांनी रात्री नोटिसा देऊन गावाला वेढा घातल्याचा तसेच शेतकऱ्यांना कुटुंबासह नजरकैदेत ठेवल्याचा आरोप त्यांनी केला. मोजणीच्या पंचनाम्यावर गावकऱ्यांनी सह्या केलेल्या नसल्याचेही त्यांनी सांगितले. समन्वयक गिरीश फोंडे यांनी जबरदस्तीने मोजणी केल्याने जमीन संपादित झाली, असा गैरसमज सरकारने करून घेऊ नये, अशी भूमिका मांडली.

तळहाताच्या फोडाप्रमाणे जीवापाड जपलेल्या जमिनी एका क्षणात शक्तीपीठासाठी देण्यास शेतकऱ्यांचा कडाडून विरोध आहे. या जमिनी हातच्या गेल्या तर खायचे काय, अशी भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. या जाणिवेतून हा लढा पुकारण्यात येत आहे.

कन्नमवारनगरमध्ये २४ ठिकाणी पोलिओ लसीकरणाची सुविधा

घरोघरी जाऊन गर्भवती मातांचा शोध; आरोग्य कर्मचारी आणि आशा सेविकांचा सक्रिय सहभाग

■ मुंबई : (दै. संध्या)



लहान मुलांचे नियमित लसीकरण आणि पोलिओ प्रतिबंधासाठी विक्रोळीतील कन्नमवार नगर परिसरात आरोग्य विभागाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. परिसरात २४ ठिकाणी पोलिओ व बाललसीकरणाची सुविधा उपलब्ध असून, महानगरपालिका शाळेत दर शनिवारी लसीकरण केले जाते. कन्नमवार नगर पोलिओमुक्त करण्याचा ठाम निर्धार असल्याची ग्वाही कन्नमवार नगर आरोग्य केंद्राच्या समन्वयक सुवर्णा शेवाळे यांनी दिली.


लहान मुलांचे लसीकरण वेळेवर व्हावे, तसेच कोणतेही मूल लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन पालकांशी संपर्क साधतात. गर्भवती मातांची माहिती संकलित करून त्यांना आवश्यक आरोग्यसेवा मिळवून देण्यावरही भर दिला जात आहे. विशेषतः झोपडपट्टी परिसरातील गर्भवती मातांना आवश्यक इंजेक्शन व वैद्यकीय सेवांसाठी टागोर नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रसूती रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला जातो. महानगरपालिका शाळेत दर शनिवारी होणाऱ्या लसीकरण मोहिमेत अंदाजे २५ मुले सहभागी होतात. या आरोग्य उपक्रमासाठी पाच परिचारिका आणि सात आशा सेविका कार्यरत आहेत. लसीकरणाबाबत जनजागृती करणे, पालकांना मार्गदर्शन करणे आणि लाभार्थ्यांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे, अशी विविध कामे त्यांच्याकडून केली जातात.कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाच्या परिसरातही लसीकरण मोहिमेत आरोग्य कर्मचारी नियमित सहभाग घेतात. परिचारिका तृप्ती शेलार, आरोग्य सेविका रश्मी राजीव पांडेश्वर, नाविन्या राणे आणि प्रीती पंकज डोंगरे या मोहिमेत सातत्याने योगदान देत आहेत. दरम्यान, मुंबई महापालिकेच्या याबाबत ॲपचा वापर करून जागरूक नागरिक आरोग्यविषयक नोंदणी करतात. डिजिटल माध्यमांचा वापर आणि प्रत्यक्ष घरोघरी संपर्क या दोन्ही मार्गांनी लसीकरणाची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



कोण होणार सोमेश्वर कारखान्याचा कारभारी? दिग्गजांचे लक्ष मतमोजणीवर

■ तिरंगी लढतीमुळे उमेदवारांची धाकधूक वाढली

बारामती : दैनिक संध्या

महाराष्ट्र राज्यातील दोन प्रमुख जिल्हे व चार तालुक्यात कार्यक्षेत्र असणाऱ्या व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला सर्वात जास्त भाव देणाऱ्या श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक तिरंगी लढतीमुळे चुरशीची ठरली आहे.निवडणुकीत विजयी होण्यासाठी तिन्ही पॅनल प्रमुखांसह सर्व उमेदवारांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. प्रशासनाच्या सहकार्याने मतदान प्रक्रिया कोणताही अनुचित प्रकार न घडता शांतता आणि सुरक्षिततेत पार पडली. श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यासाठी सभासदांकडून सायंकाळी चार वाजेपर्यंत ६८ % मतदान करण्यात आले.सभासदांच्या हितासाठी व विकासासाठी कार्य करणार असल्याचे पॅनल प्रमुखांनी जाहीरनाम्यात सांगितले असले तरी सभासद मतपेटीतून काय कौल देणार याकडे राजकीय,सहकार क्षेत्रातील नेत्यांसह अनेक दिग्गजांचे व सभासदांचे मतमोजणीकडे लक्ष लागले आहे.



सासवडच्या शोकसभेत आबा क्षीरसागर यांना श्रद्धांजली

सासवड : दैनिक संध्या

पैशाने नाही पण मनाने प्रचंड श्रीमंत असलेल्या नामदेव शिंपी समाजातील आबासाहेब गोपाळराव क्षीरसागर यांच्याविषयी अनेकांच्या मनात वेगवेगळ्या स्मृती आहेत त्यांचे संकलन करून एक सुंदर पुस्तक काढू. ती त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे विचार आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयराव कोलते यांनी व्यक्त केले आहेत. नामदेव शिंपी समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते, शरद सहकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन आबासाहेब क्षीरसागर यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी नुकतेच निधन झाले त्यांच्या शोकसभेत कोलते बोलत होते. याच कार्यक्रमात जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. क्षीरसागर यांच्या अनेक स्मृतीना या वेळी अनेकांनी उजाळा दिला. सदरच्या सभेत अँड दिलीप निरगुडे, नंदूकाका जगताप बाळासाहेब मुळीक, माऊली जगताप, अँड अण्णासाहेब खाडे, डॉ दिपक जगताप, गोविंदबापु बोत्रे, माऊली मेमाणे शामकांत भिंताडे आदींनी मनोगतातून क्षीरसागर व नाना पाटेकर यांना आदरांजली वाहिली. शांताराम पोमण यांनी सूत्रसंचालन केले. संजय चव्हाण, डॉ राजेश दळवी, केदार क्षीरसागर, रुपाली क्षीरसागर, सर्जराव पोमण, दशरथ कामथे, प्रदिप दुर्गाडे, प्रशांत जगताप, अशोक पवार, हेमंत ताकवले सुनील वढणे, जगदीश शिंदे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सासवडसह परिसरात शारदीय नवरात्र उत्सवाला प्रारंभ



सासवड : दैनिक संध्या

स्त्रीशक्तीच्या जागराचा व आदिमायेच्या आराधनेचा उत्सव असणाऱ्या शारदीय नवरात्रास आज पासुन मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला असुन पुढील दहा दिवस हा सोहळा उत्तरोत्तर रंगत जाणार आहे. सासवड व परिसरात आज जागोजागी मंदिरात घटस्थापना कार्यक्रम भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. सासवडचे ग्रामदैवत असलेल्या काळभैरवनाथ मंदिरात पहाटे महापूजा, आरती अभिषेक व अन्य धार्मिक विधी होऊन बारा वाजता हर्ष, प्रकाश व विनायक भैरवकर या पुजारी बंधुच्या हस्ते घट स्थापना झाली. श्री कालभैरवनाथ ट्रस्ट व चैत्री उत्सवाचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने यावेळी हजर होते. तालुक्यातील हरगुडे या गावी श्री जानाई मंदिरात अकरा वाजता घट स्थापना झाली तत्पूर्वी महापूजा, अभिषेक, आरती व अन्य धार्मिक विधी पार पडल्याचे गावचे पुजारी यशवंत हरगुडकर यांनी सांगितले. मंदिरात सुमारे २५० हुन अधिक समया प्रज्वलीत केल्याचेही त्यांनी सांगितले. पूर्व भागातील वनपुरी येथील भैरवनाथ मंदिरात गावचे पुजारी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत अभिषेक, महापूजा देवतांना पोशाख, धान्य वाटप होऊन घटस्थापना झाली. जगन्नाथ रूढ व महादेव रूढ यांनी पौराहित्य केले.नंतर पारायण वाचन, सायंकाळी श्री विठ्ठल भजनी मंडळाचे भजन व रात्री छबीन्याने पहिला दिवस साजरा करण्यात आला. सासवड येथील महालक्ष्मी मंदिरात व्यवस्थापक संतोष चवरे यांच्या उपस्थितीत घटस्थापना करण्यात आली. श्री काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्ट येथील व्यवस्था पाहणार असुन दहा दिवस नित्यपुजा, महाआरती, श्रीसुक्त पठण भजन आदी कार्यक्रम होत असल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष रमेश जगताप यांनी सांगितले. दरम्यान सगळीकडेच हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जात असल्याचे चित्र आहे.

पूर्व हवेली तालुक्यातील प्रश्न तेच नागरिकांच्या अपेक्षा मात्र वाढल्या

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

पूर्व हवेली तालुक्यातील विविध गावांमध्ये गेल्या काही काळापासून अनेक विकासकामे प्रलंबित आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, गटारे, सांडपाणी व्यवस्था, वाहतूक कोंडी, अंतर्गत रस्ते यांसह विविध मूलभूत प्रश्न आजही कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. तालुक्यात झपाट्याने नागरीकरण आणि लोकसंख्या वाढत असताना उपलब्ध नागरी सुविधांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे विकासकामांना मंजुरी, निधीची तरतूद आणि आश्वासने यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष कामांना गती देण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रलंबित विकासकामे नेमकी कधी पूर्ण होणार? नागरिकांना मूलभूत सुविधा कधी मिळणार? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पूर्व हवेलीतील वाढत्या नागरीकरणाचा विचार करून संबंधित प्रशासन व लोकप्रतिनिधींनी प्रलंबित कामांचा तातडीने आढावा घेऊन प्रत्येक कामासाठी निश्चित कालमर्यादा ठरवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आश्वासनांची पुनरावृत्ती नको, आता प्रत्यक्ष विकासकामांना गती हवी, अशी अपेक्षा पूर्व हवेलीतील नागरिक व्यक्त करीत आहेत. पूर्व हवेली तालुक्यातील विविध गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांची कामे संथ गतीने सुरू असल्याचे चित्र दिसत असून, या योजनांची कामे पूर्ण होऊन नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठ्याचा लाभ कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सौर ऊर्जेच्या प्रसारासाठी 'सौर संवाद २०२६' यात्रेचे आयोजन

गोपाल काबरा फाउंडेशन व जीके एनर्जी यांचा संयुक्त उपक्रम; यात्रेतून १४ जिल्ह्यात साधणार संवाद

■ पुणे (दै. संध्या)

सौर ऊर्जेबाबत जनजागृती करण्यासह या क्षेत्रातील उद्योजकता आणि रोजगाराच्या संधी ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यासाठी गोपाल काबरा फाउंडेशन आणि जीके एनर्जी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'सौर संवाद २०२६' यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १२ ते १८ ऑक्टोबर २०२६ यादरम्यान होणाऱ्या या यात्रेचा शुभारंभ सोमवारी (दि. १२) सकाळी ९.३० वाजता अहिल्यानगर येथून होणार आहे. महाराष्ट्रातील १४ शहरांमध्ये ही यात्रा पोहोचणार असून, त्यामध्ये अहिल्यानगर, संभाजीनगर, नाशिक, धुळे, बुलढाणा, अमरावती, भांडारा, चंद्रपूर, वाशीम, नांदेड, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, पुणे या जिल्ह्यात जनजागृती करणार आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांतील इच्छुक उद्योजकांना जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सौर ऊर्जेचा वापर केवळ वीज निर्मितीपुरता मर्यादित न ठेवता त्यातून स्थानिक व्यवसाय, रोजगार आणि आर्थिक संधी निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विशेषतः युवक आणि महिलांना सौर ऊर्जा क्षेत्रातील व्यवसायाच्या संधींची माहिती देऊन त्यांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. एक हजारांहून अधिक इच्छुक उद्योजकांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट या उपक्रमाने ठेवले आहे.

केंद्र सरकारने व महाराष्ट्र सरकारने सौर ऊर्जेच्या वापरासाठी प्रोत्साहनपर अनेक योजना हाती घेतल्या आहेत. त्यालाही या यात्रेमुळे चालना मिळणार आहे, असे जीके एनर्जी लिमिटेडचेअरमन व व्यवस्थापकीय संचालक गोपाल काबरा यांनी सांगितले. घरगुती छतावरील (रुफटॉप) सौर यंत्रणा, व्यावसायिक सौर प्रकल्प, सौर कृषिपंप, ऊर्जा साठवण, यंत्रणा बसविणे, देखभाल आणि वितरण अशा विविध क्षेत्रांतील संधींची माहिती यात्रेदरम्यान दिली जाणार आहे. तसेच विक्री, सेवा आणि तांत्रिक कामांसाठी स्थानिक पातळीवर व्यवसाय कसा सुरू करता येईल, याबाबत व्यावहारिक मार्गदर्शन केले जाईल.



आमदार माऊलीआबा कटके यांच्या जनता दरबाराला हवेलीतील नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद

■ लोणी काळभोर (दै. संध्या)



शिरूर - हवेली विधानसभा मतदारसंघाचे आमदार माऊली आबा कटके यांच्या उपस्थितीत कुंजीरवाडी येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. या जनता दरबाराला हवेलीतील नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. यावेळी परिसरातील नागरिकांनी विविध नागरी समस्या आणि प्रलंबित प्रश्न मांडले. यामध्ये प्रामुख्याने वीजपुरवठ्याशी संबंधित समस्या, उन्नत मार्गासाठी होणारे भूसंपादन तसेच रेल्वे प्रकल्पाच्या भूसंपादनासंदर्भातील प्रश्नांवर नागरिकांनी आपली भूमिका मांडली. यावेळी हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित दादा गट) अध्यक्ष दिलीप वाल्हेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर, सुदर्शन चौधरी, कुंजीरवाडीचे माजी सरपंच सचिन तुपे, लोणी काळभोरचे प्रसाशकीय सरपंच नागेश काळभोर, तरडेचे माजी सरपंच मारुती बरकडे, लोणी काळभोरचे माजी उपसरपंच राजेंद्र काळभोर, साधना सहकारी बँकेचे संचालक बापूसाहेब बोरकर, उद्योगपती माऊली नारायण काळभोर, विकास सोसायटीचे माजी चेअरमन विठ्ठल काळभोर, युवराज काळभोर, सतिश काळभोर, संजय काळभोर, नबाजी रुपनवर, सुहास चौधरी, किरण कुंजीर, चंपकलाल गवते, निळकंठ काळे, संतोष घोलप व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पूर्व हवेली परिसरात विविध विकासकामे आणि पायाभूत सुविधांसंदर्भातील प्रश्नांमुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यावर आमदार माऊली आबा कटके यांनी भर दिला .लवकरच हडपसर ते यवत पर्यंत उन्नत मार्ग सुरू होणारा असून त्यासाठी भूसंपादनात बऱ्याच त्रुटी असल्याचे लोणी काळभोर परिसरातील नागरिकांनी आमदार माऊली कटके यांना दाखवून दिल्या. परिसरातील प्रस्तावित उन्नत मार्गासाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनाचा विषयही जनता दरबारात उपस्थित करण्यात आला. या प्रकल्पासाठी जमीन संपादित करताना संबंधित जमीनमालकांचे प्रश्न, जमिनीचा मोबदला आणि भूसंपादनाची प्रक्रिया याबाबत नागरिकांना स्पष्टता मिळणे आवश्यक असल्याचे मत मांडण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर, प्रशासकीय सरपंच नागेश काळभोर, लोणी काळभोरचे माजी उपसरपंच राजेंद्र काळभोर, विठ्ठल चेअरमन, बापू बोरकर, माऊली काळभोर यांनी याविषयी आमदार माऊली आबा यांना सांगताच त्यांनी लवकरच शेतकरी व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

श्री महालक्ष्मी मंदिरातील 'शृंगार' या संकल्पनेवरील सजावट व विद्युतरोषणाईचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

■ श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग; पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची उपस्थिती

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबागच्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्रोत्सवात मंदिरामध्ये साकारलेल्या 'शृंगार' संकल्पनेवर आधारित भव्य सजावट व विद्युत रोषणाईचे उद्घाटन पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते झाले. मंदिराचे भव्य प्रवेशद्वार देखील या संकल्पनेवर साकारले असून ते पाहण्याकरिता देवी भक्तांनी मोठी गर्दी केली. यावेळी ट्रस्टचे प्रमुख संस्थापक आणि विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, भरत अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर यांसह विश्वस्त, पदाधिकारी उपस्थित होते. मंदिरासह परिसरात साकारण्यात आलेली विद्युत रोषणाई देखील भक्तांचे लक्ष वेधून घेत आहे. यंदाच्या नवरात्रोत्सवात 'शृंगार' या संकल्पनेवर आधारित सजावट मंदिरामध्ये व भव्य प्रवेशद्वारावर करण्यात आली आहे. यामध्ये मंगळसूत्र, जोडवी, हिरवा चुडा, नथ, कोल्हापुरी साज, ठुशी, तन्मणी, पैंजण, पाटल्या, मोहनमाळ, बोरमाळ यांसह विविध प्रकारचे दागिने आणि सौभाग्यलंकार यांच्या सुरेख प्रतिकृती साकारण्यात आल्या आहेत. तसेच मंदिरामध्ये विविध खांबावर देखील या प्रतिकृती पाहायला मिळतात. त्यामुळे ही सजावट देवीभक्तांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० वाजता अष्टलक्ष्मी भव्य मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे. तसेच ललिता पंचमीला गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता कन्यापूजन कार्यक्रम आणि शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी गाथा शिवशंभूंची हा जिवंत देखावा ही यंदाच्या उत्सवाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

नानगाव येथे खरीप हंगाम दुष्काळ पंचनाम्याबाबत जनजागृती

शेतकऱ्यांना पंचनामा अर्ज करण्याचे आवाहन; पीएम किसान व महिला शेतकरी प्रमाणपत्राबाबत मार्गदर्शन

■ पुणे (दै. संध्या)



खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर दौंड तालुक्यात १०४ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून शेतकऱ्यांनी पिकांचा पंचनामा करण्यासाठी अर्ज करावेत, यासाठी नानगाव ग्रामपंचायत कार्यालयात प्रचार-प्रसिद्धी व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात ग्राम महसूल अधिकारी श्रीमती नीलिमा बोकडे, ग्रामपंचायत अधिकारी नानगाव, सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती स्नेहल शिंदे तसेच परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

यावेळी खरीप हंगाम दुष्काळ पंचनामा, पीएम किसान योजना आणि महिला शेतकरी प्रमाणपत्र या महत्त्वपूर्ण विषयांवर माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले. दुष्काळ पंचनाम्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता, संबंधित प्रक्रियेतील महत्त्वाच्या बाबी तसेच शेतकऱ्यांनी घ्यावयाची दक्षता याबाबत माहिती देण्यात आली. तसेच पीएम किसान योजनेचा लाभ, महिला शेतकरी प्रमाणपत्राचे महत्त्व आणि संबंधित शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक बाबी यांची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना देण्यात आली.

शासकीय योजनांची माहिती तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावी, पात्र शेतकऱ्यांना योजनांचा लाभ घेता यावा आणि दुष्काळ पंचनामा प्रक्रियेबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने हे मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करून आवश्यक मार्गदर्शन केले. संबंधित शेतकऱ्यांनी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

महापुरुषांची बदनामी थांबवण्यासाठी कायदे करण्याची आवश्यकता

डॉ. मुकुंद दातार : समर्थभक्त ज्येष्ठ पत्रकार मधू नेने श्रद्धांजली सभेतील मागणी

■ पुणे (दै. संध्या)



महापुरुषांची बदनामी, अवहेलना थांबवण्यासाठी केंद्र सरकारने स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता आहे, ज्यासाठी मोठे जनआंदोलन उभे करायला हवे, अशी आग्रही मागणी गीता धर्म मंडळाचे अध्यक्ष डॉ. मुकुंद दातार यांनी आज येथे केली. समर्थभक्त ज्येष्ठ पत्रकार स्व. मधू नेने यांच्या श्रध्दांजली सभेत ते बोलत होते. समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड संचलित श्रीमत् ग्रंथराज दासबोध अध्ययन आणि श्री समर्थ मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ही शोकसभा आयोजित करण्यात आली होती, त्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. चारुदत्त आफळे, सुहास क्षीरसागर व विनायक वझे उपस्थित होते. यावेळी दातार पुढे म्हणाले की, आज सर्वच जाती-धर्मातील महापुरुषांची सर्रास बदनामी, टिंगल टवाळी केली जाते, हे थांबवायला हवे. घटनात्मक आणि सर्वोच्च पदांवरील व्यक्तींची तसेच संत-महंत आणि श्रध्दास्थानांची देखील बदनामी केली जाते, हे थांबवण्यासाठी कडक कायदे करण्याची आवश्यकता आहे. समर्थभक्त मधू नेने यांनी सज्जनगड मासिक पत्रिकेच्या माध्यमातून यासाठी अनेकदा लिखाण केले होते. असे कायदे झाल्यास तीच मधू नेने यांना खरी श्रध्दांजली ठरेल.

पत्रकारिता, सहकार, संघटक असलेल्या मधू नेनेंचे बहुआयामी व्यक्तिमत्व प्रेरणादायी होते, अशा भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केल्या तर त्यांच्या आठवणींना उजाळा देतांना सर्वश्री रमण चितळे, मंजिरी धुपकर, भालचंद्र कुलकर्णी, विरेंद्र ताटके, अविनाश हळबे, स्वाती देशपांडे, दिवाकर देशपांडे, विक्रम केळकर, दीपा भंडारे, कल्पना ताडे आदिंनी यावेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. सुहास कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. समर्थभक्त दीपा भंडारे यांनी सादर केलेल्या 'कल्याण करी' या प्रार्थनेने शोकसभेची सांगता झाली.

विजेत्याला मिळाली नवीन एक्सयूव्ही ७ एक्सओ कार

■ पुणे (दै. संध्या)

सॉलिटेअर अनेकदा आयुष्यातील त्या खास क्षणांचा भाग बनतो, जे लोक वर्षानुवर्षे जपून ठेवतात. आयुष्यातील एखाद्या महत्त्वपूर्ण यशाच्या, नात्यातील आनंदाच्या किंवा स्वतःच्या आवडीनुसार केलेल्या खरेदीच्या प्रसंगी सॉलिटेअरला विशेष महत्त्व असते. याच भावनेचा विचार करून डिव्हाईन सॉलिटेयर्सतर्फे आयोजित भारतीय सॉलिटेअर महोत्सव २०२६ ची पुण्यातील चिंचवड येथील रांका ज्वेलर्स येथे बक्षीस वितरण सोहळ्याने उत्साहपूर्ण सांगता झाली. श्री. अमरदीप जिंदे यांचा भारतीय सॉलिटेअर महोत्सव २०२६ चे बंपर बक्षीस विजेते म्हणून सन्मान करण्यात आला आणि त्यांना नवीन एक्सयूव्ही ७ एक्सओ कारच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या. यासोबतच देशव्यापी महोत्सवाची संस्मरणीय सांगता झाली. यावर्षी हा महोत्सव देशातील १०० हून अधिक शहरांमधील २०० हून अधिक भागीदार दागिन्यांच्या दुकानांमध्ये आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवाच्या माध्यमातून ग्राहकांना सॉलिटेअर जवळून जाणून घेण्याची आणि खरेदी करण्याची संधी मिळाली. याअंतर्गत निश्चित भेटवस्तू, साप्ताहिक भाग्यवान सोडत आणि राष्ट्रीय स्तरावर बंपर बक्षीस जिंकण्याची संधी देण्यात आली. तसेच, गुणवत्ता, प्रमाणपत्रे आणि पारदर्शक किंमत निर्धारणावर भर देऊन ग्राहकांना विचारपूर्वक खरेदी करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. रांका ज्वेलर्ससारख्या विक्री भागीदारांनी हा महोत्सव ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. चिंचवड येथील रांका ज्वेलर्सच्या दुकानात बंपर बक्षीस विजेत्याला सुपूर्द करण्यात आल्याने यावर्षीच्या महोत्सवाची सांगता झाली.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी नारायणगाव पोलिसांचा पुढाकार

■ निर्भया पथकाकडून जनजागृती

■ बाजार समितीमध्ये महिला, युवती, शेतकरी, वाहनचालक व कामगारांना मार्गदर्शन

■ सायबर फसवणूक, बालकामगार प्रतिबंध आणि आपत्कालीन पोलीस मदतीबाबत प्रबोधन

■ नारायणगाव (दै. संध्या)



महिलांची सुरक्षितता, कामाच्या ठिकाणी घ्यावयाची खबरदारी, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण आणि बालकामगार प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यासाठी नारायणगाव पोलिसांच्या वतीने वारूळवाडी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती, जुन्नरच्या उपबाजार आवारातील धना-मेथी मार्केटमध्ये समुपदेशन व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ८ वा. झालेल्या या उपक्रमात महिला, युवती, शेतकरी, वाहनचालक आणि हमाल यांना सुरक्षिततेविषयी महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथकाच्या प्रमुख महिला पोलीस उपनिरीक्षक स्वाती धोंगडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. निर्भया पथकाची भूमिका, महिलांनी कामाच्या ठिकाणी घ्यावयाची काळजी, संकटाच्या वेळी मदत मिळविण्याचे मार्ग, सायबर गुन्ह्यांपासून बचाव, मोबाईलचा सुरक्षित वापर आणि बालकामगार प्रतिबंधक कायद्याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. वारूळवाडी येथील धना-मेथी मार्केटमध्ये शेतमालाची खरेदी-विक्री, वाहतूक आणि इतर कामांसाठी दररोज अनेक महिला, शेतकरी व कामगार येत असतात. त्यामुळे महिलांनी आपल्या सुरक्षिततेबाबत सतर्क राहावे, अनोळखी व्यक्तींशी व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी आणि कोणतीही अनुचित घटना घडल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले. मोबाईलचा वाढता वापर लक्षात घेता अनोळखी लिंकवर क्लिक न करणे, ओटीपी व बँक खात्याची गोपनीय माहिती कोणालाही न देणे आणि संशयास्पद फोन किंवा संदेशांपासून सावध राहणे, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. सायबर फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सतर्क राहण्याचे आवाहन उपस्थितांना करण्यात आले.